POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१४१ ● मुंबई, मंगळवार, २३ डिसेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA



## राज्यात मनपा निवडणुकीचा धुरळा सुरु

## जागावाटपासाठी महायुती आणि महाविकास आघाडी अजूनही चर्चेच्या गुऱ्हाळात अडकली!

मुंबईसह राज्यातील मुदत संपलेल्या २७ आणि नव्याने स्थापन झालेल्या जालना आणि इचलकरंजी मनपासाठी उद्यापासून (२३ डिसेंबर) रणधुमाळी सुरु होत आहे. राज्यातील सर्व मनपांसाठी एकत्रित मतदान १५ जानेवारी रोजी होणार आहे, तर मतमोजणी दुसऱ्याच दिवशी 16 जानेवारी रोजी होणार आहे. निवडणुकीसाठी अवघ्या 23 दिवसांचा अवधी असताना अजूनही मनपा जागावाटपासाठी महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये जागावाटपावरून घोडं अडल्याचं चित्र आहे. मनपा निवडणुकीसाठी 1 जुलै 2025 ची मतदार यादी ग्राह्य धरली जाणार आहे. गेल्या पाच ते सहा वर्षांपासून सर्वच मनपांमध्ये प्रशासकराज सुरु असल्याने संपूर्ण व्यवस्था कोलमडली आहे. त्यामुळे आता मनपा नव्या वर्षात आता कारभाऱ्यांनी भरून जाणार आहेत.

**उद्यापासून अर्ज भरण्यास सुरुवात :** राज्यात सर्वच मनपांसाठी उद्यापासून (२३ डिसेंबर) अर्ज भरण्यास सुरुवात होणार आहे. ऑफलाईन नामनिर्देशन स्वीकारली जाणार आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा कालावधी 23 ते 31 डिसेंबर असणार आहे. सर्व दाखल उमेदवार अर्जांची छाननी दुसऱ्याच दिवशी म्हणजेच 31 डिसेंबर रोजी केली जाणार आहे. उमेदवारी अर्ज माघार घेण्याचा दिवस 1 जानेवारी 2026 आहे. चिन्ह आणि अंतिम उमेदवार यादी 3 जानेवारी रोजी प्रसिद्ध केली जाईल. मतदान 15 जानेवारी रोजी होणार असून निकाल 16 जानेवारी रोजी असेल.

**जागावाटपावरून डोकेदुखी :** दरम्यान, मनपा निवडणुकीसाठी महायुतीसह महाविकास आघाडीने सुद्धा कंबर कसली आहे. मुंबई महानगरसह राज्यात जवळपास सर्वच ठिकाणी शिंदेंची शिवसेना आणि भाजप एकत्रित लढतील असे चित्र आहे. पुण्यात राष्ट्रवादी विरुद्ध भाजप असा सामना रंगण्याची शक्यता आहे. काँग्रेसला सोबत घेण्यासाठी अजित पवारांनी काँग्रेसचे विधानपरिषदेतील गटनेते सतेज पाटील यांना फोन केल्याची चर्चा आहे. ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक सहा मनपा असून याठिकाणी भाजप आणि शिंदे सेनेत युतीवरून अजूनही खणाखणी सुरु आहे. नगरपालिका आणि नगर पंचायत निवडणुकीत शिंदेंचा स्ट्राईक रेट तुलनेत सर्वाधिक राहिल्याने त्यांची जागावाटपात ताकद वाढली आहे.

**ठाकरे बंधूंची यूती अंतिम टप्प्यात :** दरम्यान, मुंबई महानगरसह राज्यात जवळपास 10 मनपांमध्ये ठाकरे बंधू एकत्र येण्यावर जवळपास शिक्कामोर्तब झालं आहे. दोन्ही पक्षांकडून उद्या (23 डिसेंबर) घोषणा होण्याची शक्यता आहे. शिवसेना खासदा संजय राऊत यांनी यासंदर्भात संकेत दिले आहेत. मराठीबहुल वार्डात दोन्ही पक्षांमध्ये चढाओढ असल्याने राज ठाकरे यांनी संजय राऊत आणि अनिल परब यांना सबुरीचा सल्ला देत एक पाऊल मागे टाकलं आहे.

**नगरपालिका निवडणुकीत महायुतीचा मोठा विजय :** दरम्यान, नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकीत सत्ताधारी महायुती आघाडीने मोठा विजय मिळवला. 288 जागांसाठी (246 नगरपरिषदा आणि 42 नगरपंचायती) युतीने 207 जागा जिंकल्या. भाजप 117 जागा जिंकून आघाडीतील सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं 53 जागा जिंकल्या, तर राष्ट्रवादी काँग्रेसने 37 जागा जिंकल्या. महाविकास आघाडी 44 जागांपर्यंत मर्यादित राहिली. काँग्रेसने 28 जागा जिंकल्या, तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीने फक्त 7 जागा जिंकल्या आणि शिवसेनेने (यूबीटी) 9 जागा जिंकल्या. इतरांनी 32 जागा जिंकल्या आहेत.

# महायुतीची मुसंडी... मविआची घसरगुंडी

## राज्यात भाजपच 'नंबर वन'... महाविकास आघाडीची अर्धशतकापर्यंतच मजल

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

गेल्या काही वर्षांपासून प्रलंबित असलेल्या नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीचा बार अखेर उडाला. महायुतीने विधानसभेप्रमाणेच नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीतही घवघवीत यश मिळवत आपली जादू कायम ठेवली आहे. या निवडणुकीत राज्यात भाजपच पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला. भाजपचे १२९ उमेदवार नगराध्यक्षपदी विराजमान झाले. शिवसेना शिंदे गटाचे ५८, तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे ३७ नगराध्यक्ष विजयी झाले. तर दुसरीकडे महाविकास आघाडीला नगरपालिका निवडणुकीत अर्धशतकापर्यंतच मजल मारता आली. राज्यातील २८८ नगरपालिकांच्या निवडणुकीत महायुतीचा वरचष्मा राहिला आहे. २८८ पैकी तब्बल २१३ नगरपालिकांमध्ये थेट नगराध्यक्ष निवडून आणण्यात महायुतीतील घटक पक्षांना यश मिळाले. महायुतीत सर्वाधिक जागांवर विजय मिळवत आपणच मोठा भाऊ असल्याचे भाजपने दाखवून दिले आहे. राज्यातील २४२ नगरपरिषद आणि ४६ नगरपंचायतीसाठी २ डिसेंबर आणि २० डिसेंबर अशा दोन टप्प्यात मतदान झाले. त्याची मतमोजणी रविवार, २१ डिसेंबर रोजी पार पडली. या निकालातही महायुतीला अनपेक्षित यश मिळाले. महाविकास आघाडीचा करिष्मा कुठेच दिसला नाही.

या निवडणुकीत महायुतीने काही ठिकाणी युती तर काही ठिकाणी स्वबळावर निवडणूक लढवली होती. विदभार्तील १०० नगरपालिकांपैकी भाजपने ५८ ठिकाणी विजय मिळवला. तर, काँग्रेसला २३ ठिकाणी यश मिळाले. शिवसेनेने ८, राष्ट्रवादीने ७ तर इतरांनी ४ जागांवर विजय मिळवला. संपूर्ण विदर्भात ठाकरेंच्या शिवसेनेला आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला शून्यातून बाहेर येता आले नाही. मराठवाड्यातील ५२ नगरपालिकांपैकी भाजपने सर्वाधिक २५ जागा जिंकल्या. शिवसेना ८, राष्ट्रवादी ६, काँग्रेसला ४, शिवसेना ठाकरे पक्षाला ४ तर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला २ ठिकाणी नगराध्यक्षपद मिळविण्यात यश आले. ३ ठिकाणी इतरांनी विजय मिळवला. उत्तर महाराष्ट्रातील ४९ नगरपालिकांपैकी भाजपला सर्वाधिक १८ ठिकाणी आपले नगराध्यक्ष निवडून आणण्यात यश मिळाले. शिवसेनेचे ११, राष्ट्रवादीचे ७, काँग्रेसचे ५, शिवसेना ठाकरे पक्षाचे २, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे १ तर ५ ठिकाणी इतरांनी विजय मिळवला. पश्चिम महाराष्ट्रातील ६० नगरपालिकांपैकी सर्वाधिक १९ ठिकाणी भाजपचे नगराध्यक्ष जिंकले. शिवसेना आणि राष्ट्रवादीचे प्रत्येकी १४ नगराध्यक्ष विजयी झाले. काँग्रेसला ३, शिवसेना ठाकरे पक्षाला १ तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीला ३ ठिकाणी तर इतर स्थानिक आघाड्यांना ६ ठिकाणी नगराध्यक्षपद मिळविण्यात यश आले. कोकणातील २७ नगरपालिकांपैकी सर्वाधिक १० ठिकाणी शिवसेनेला यश मिळाले. त्याखालोखाल भाजपला ९, शिवसेना ठाकरे पक्षाला २, राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना प्रत्येकी १ तर ४ ठिकाणी इतर स्थानिक आघाड्यांना यश मिळाले.

### पुण्यात अजितदादाच 'बॉस'... १७ पैकी १० जागांवर विजय

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या बालेकिल्ल्यात पुन्हा एकदा करिष्मा करत आपली ताकद दाखवून दिली आहे. १७ पैकी तब्बल १० ठिकाणी अजित पवारांचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार निवडून आले आहेत. राष्ट्रवादीने बारामती, इंदापूर, भोरसह एकूण १० नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदावर विजय मिळवत पुणे जिल्ह्यात आपणच मोठा भाऊ असल्याचे दाखवून दिले. भाजपला चारच ठिकाणी यश मिळाले. शिवसेना (शिंदे) पक्षाने चाकण, राजगुरुनगर आणि जुन्नर या त्यांच्या बालेकिल्ल्यात सत्ता राखत प्रतिष्ठा राखली. महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाला पुणे जिल्ह्यात सात, शिवसेना (ठाकरे) पक्षाला चार आणि काँग्रेसला फक्त लोणावळ्यात तीन जागा मिळाल्या.





### विकासाच्या अजेंड्यावर यश मिळाले - शिंदे

नकली शिवसेना म्हणणाऱ्यांची आकडेवारी सिंगल डिजिटमध्ये राहिली असून, खऱ्या शिवसेनेची ताकद महाराष्ट्रभर वाढली आहे. आज शिवसेना फक्त मुंबई-ठाण्यापुरती मर्यादित नसून चांदा ते बांदा पोहोचली आहे. नगरपालिका आणि नगरपंचायतींमधील यश हे विकासाच्या अजेंड्यावर मिळाले आहे. शिवसेना हा पक्ष सत्तेसाठी नाही, खुर्चीसाठी नाही, तर जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आहे. काम करणाऱ्याच्या पाठीशी जनता उभी राहते, याची ही पोचपावती आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

### भाजपचे ३,३२५ नगरसेवक विजयी

राज्यातील २८८ थेट नगराध्यक्ष आणि सुमारे ६ हजार २०० हून अधिक नगरसेवकपदासाठी झालेल्या या निवडणुकीत भाजपचे सर्वाधिक १२९ नगराध्यक्ष निवडून आले, तर तब्बल ३,३२५ नगरसेवक निवडून आले. २०१७ व त्यानंतर झालेल्या या जागांवरील निवडणुकीत भाजपचे १,६०० नगरसेवक निवडून आले होते. त्यात यंदा जवळपास दुप्पट वाढ झाली आहे. शिवसेना पक्षाचे ६९५ नगरसेवक निवडून आले आहेत, तर राष्ट्रवादीचे ३११ नगरसेवक विजयी झाले आहेत. काँग्रेसचे १३०० हून अधिक तर शिवसेना ठाकरे पक्षाचे ३७८ नगरसेवक निवडून आले. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे १५३ नगरसेवक निवडून आले. इतर स्थानिक आघाडी व अपक्ष असे एकूण १४० नगरसेवक निवडून आले आहेत.

### राज्याच्या इतिहासातील सर्वात मोठा विजय - फडणवीस

भाजप हाच पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला, हे पुन्हा अधोरेखित झाले. जवळपास १२९ नगराध्यक्ष भाजपचे निवडून आले आहेत. एकूण नगराध्यक्षांपैकी ७५ टक्के नगराध्यक्ष महायुतीचे आहेत. गेल्या २०-२५ वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये इतका मोठा विजय कोणालाच मिळाला नाही, जो आज भाजप आणि महायुतीला मिळाला आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, या निवडणुकीमध्ये मी पूर्ण सकारात्मक प्रचार केला. एकाही व्यक्तीविरोधात, एकाही पक्षाविरोधात, एकाही नेत्याविरोधात बोललो नाही. केवळ विकासावर मते मागितली. त्याला अतिशय चांगला प्रतिसाद सर्व लोकांनी दिला, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

### नांदेडमध्ये घराणेशाही नाकारली, ६ उमेदवारांचा पराभव

नांदेड जिल्ह्यातील लोहा नगरपरिषद निवडणुकीत मतदारांनी घराणेशाही नाकारली, त्यामुळे भाजपच्या तिकीटावर लढणाऱ्या एकाच कुटुंबातील तब्बल सहा जणांचा दारूण पराभव झाला आहे. घराणेशाहीला थारा न देता मतदारांनी लोहा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराला विजयी करत भाजपला मोठा धक्का दिला आहे. नगराध्यक्षपदाचे उमेदवार गजानन सूर्यवंशी यांच्यासहित त्यांच्या पत्नी गोदावरी सूर्यवंशी, भाऊ सचिन सूर्यवंशी, भावाची पत्नी सुप्रिया सचिन सूर्यवंशी, मेहुणा युवराज वाघमारे तसेच भाच्याची पत्नी रीना अमोल व्यवहारे या एकाच कुटुंबातील सहा जणांना पराभूत व्हावे लागले.

### मुनगंटीवारांचा भाजपला घरचा आहेर

चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण ११ पैकी ७ नगरपरिषदांवर काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले आहेत. तर भाजपचे दोन आणि शिवसेना शिंदे गटाचा नगराध्यक्षपदाचा एक उमेदवार विजयी झाला आहे. "भाजपने मला मंत्रिपद नाकारले तसेच गडचिरोली, भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर या चार जिल्ह्यातून कोणालाही मंत्रिपद दिले नाही. तसेच ज्या पद्धतीने भाजपने बाहेरील पक्षातील नेत्यांसाठी दरवाजे उघडून ठेवले, वाटेल त्याला प्रवेश दिले त्याचा परिणाम मतदारांवर होत आहे. शनिशिंगणापूरनंतर आमचा दुसरा असा पक्ष आहे, जिथे दारे नाहीत. त्यामुळे मतदारांनी या निवडणुकीत आम्हाला नाकारले. त्यामुळे हा पराभव मान्य करतो," अशा शब्दांत भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी भाजपला घरचा आहेर दिला.

### मनसेचे ११ उमेदवार विजयी

नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीत मनसेने जोरदार कमबॅक केलेले आहे. मनसेचे एकूण ११ उमेदवार नगरसेवकपदी विजयी झाले आहेत. गुहागर नगरपंचायतीवर कोमल जांगळी या नगरसेवकपदी विजयी झाल्या. अनुराग कोचिरकर (देवरुख), सिद्धेश वेल्हाळ (देवरुख), अक्षय झेपले (देवरुख), संतोष चव्हाण (वडगाव, कोल्हापूर), माधुरी दिलीप धोत्रे (पंढरपूर), स्वाती नागेश चौगुले (गडहिंग्लज), राज पाटील (अचलपूर), दौलत पाटील (हुपरी), वाहेद शेख (रेणापूर, लातूर), साईप्रसाद जटालवर (भोकर), कोमल जागळी (गुहागर) हे मनसेचे उमेदवार विजयी ठरले आहेत.

### शिंदेच्या बालेकिल्ल्यांना भाजपकडून सुरुंग

निवडणुकीआधी भाजप-शिवसेना या सत्ताधारी पक्षांमधील वाद दिल्ली दरबारी गेल्यानंतर आता प्रत्यक्ष निवडणुकीत भाजपने मात्र एकनाथ शिंदेंच्या अंबरनाथ आणि बदलापूर या दोन बालेकिल्ल्यांना सुरूंग लावला. बदलापुरात शिंदेंच्या शिवसेनेचे २४ नगरसेवक निवडून आले असले तरी नगराध्यक्षपदी भाजपच्या रूचिता घोरपडे विजयी झाल्या आणि भाजपचे २२ नगरसेवक निवडून आले आहेत. शिवसेनेचे नेते वामन म्हात्रे, त्यांच्या पत्नी तसेच भावाला पराभव पत्करावा लागला. अंबरनाथमध्ये भाजपच्या तेजश्री करंजुले यांनी शिंदे गटाच्या मनीषा वाळेकर यांचा तब्बल सहा हजार मतांच्या फरकाने पराभव करत नगराध्यक्ष होण्याचा मान मिळवला. अंबरनाथमध्ये भाजपचे १०, शिंदे गटाचे २३, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) चार तर काँग्रेसचे १२ नगरसेवक निवडून आले आहेत.

### परळीत भाजप-राष्ट्रवादी युतीचा विजय

नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत बीड जिल्ह्यात महायुतीने विरोधकांचा अक्षरशः धुव्वा उडवला आहे. परळीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, भाजप आणि रिपाइंच्या महायुतीने ऐतिहासिक विजय मिळवला असून, अंबाजोगाई आणि गेवराईतही भाजपने आपला झेंडा फडकवला आहे. या विजयानंतर बोलताना आमदार धनंजय मुंडे आणि आमदार पंकजा मुंडे यांनी जनतेचे आभार मानत विरोधकांवर जोरदार निशाणा साधला.

### मालवण, कणकवलीत भाऊ नितेशपेक्षा निलेश वरचढ

कोकणातील मालवण आणि कणकवली नगर परिषदांची निवडणूक ही निलेश राणे आणि नितेश राणे या बंधूंमध्ये रंगली. मात्र, निलेश विरुद्ध नितेश या स्पर्धेत निलेश राणे यांनी बाजी मारली आहे. मालवण नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्षपदाच्या अत्यंत प्रतिष्ठेच्या लढतीत शिवसेना शिंदे गटाच्या ममता वराडकर यांनी भाजपच्या उमेदवाराचा १०१९ मतांच्या फरकाने पराभव करत विजय संपादन केला. मालवणमध्ये शिवसेना शिंदेंचे १०, भाजपचे ५, आणि शिवसेना ठाकरे गटाचे ५ उमेदवार नगरसेवक म्हणून निवडून आले. कणकवलीत शहर विकास आघाडीचे संदेश पारकर निवडून आले. भाजपच्या समीर नलावडे यांचा पराभव झाला. वेंगुर्ल्यात भाजपचे दिलीप गिरप तर सावंतवाडीमध्ये भाजपचे श्रद्धाराजे भोसले नगराध्यक्षपदी निवडून आले.

### सौरभ तायडे, सिद्धी वस्त्रे सर्वात तरुण नगराध्यक्ष

सर्वात तरुण नगराध्यक्ष होण्याचा मान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या सौरभ विजय तायडे (२१ वर्ष, १० महिने) याने पटकावला. सोलापूरमधील मोहोळ नगरपरिषदेच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार सिद्धी वस्त्रे (२२ वर्षे) या राज्यातील सर्वात तरुण महिला नगराध्यक्ष ठरल्या आहेत.

# लाडक्या बहिणींवर अपात्रतेची तलवार

## ई केवायसी न केल्यास योजनेतून होणार आऊट

### केवळ १ कोटी ६० लाख महिलांनी केली केवायसी





■ मुंबई। प्रतिनिधी,

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजनेतील अपात्र बहिणींचा शोध घेण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत ई केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. आतापर्यंत १ कोटी ६० लाख महिलांनी ई केवायसी केली असून आणखी ३० ते ४० लाख महिला ई केवायसीची प्रक्रिया पूर्ण करतील. मात्र, ३१ डिसेंबरपर्यंत ई केवायसी न केल्यास ४० लाखांहून अधिक महिला योजनेतून अपात्र होतील, असे महिला व बाल विकास विभागातील अधिकाऱ्याने सांगितले.

जुलै २०२२ मध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली. योजनेची घोषणा होताच राज्यातील २ कोटी ६० लाख महिलांनी योजनेसाठी अर्ज दाखल केले. त्यानंतर महिलांच्या बँक खात्यात प्रती महिला १५०० रुपयांप्रमाणे पैसे जमा होऊ लागले. मात्र, या योजनेचा अपात्र महिला लाभ घेत असल्याचे निदर्शनाला आले. त्यानंतर या योजनेतून १० लाख महिला अपात्र ठरल्या तर ३ लाख महिलांचे आधारकार्ड बँकेशी लिंक करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सद्यस्थितीत २ कोटी ४७ लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळत आहे. मात्र लाडकी बहीण योजनेमुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर भार येत असून लाडकी बहीण योजनेमुळे अन्य योजना गुंडाळण्याची वेळ राज्य सरकारवर आली. मात्र, लाडकी बहीण योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवर वाढता ताण लक्षात वार्षिक उत्पन्न २ लाख ५० लाखांच्यावर असलेल्या महिलांचा शोध घेण्यासाठी आता ई केवायसी बंधनकारक करण्यात आले आहे. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ज्या महिलांची ई केवायसी करणार नाहीत, त्या महिला योजनेसाठी अपात्र ठरणार आहेत. त्यामुळे लाडक्या बहिणींची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होऊन तिजोरीवरचा आर्थिक ताण कमी होणार आहे.

### अनुदानासाठी आचारसंहितेची अडचण नाही!

राज्य सरकारच्या वतीने या योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या वितरणामध्ये आचारसंहितेची कोणतीही अडचण येणार नाही. ही योजना आधीपासूनच सुरू असल्याने तिच्यावर कोणताही प्रतिबंध असणार नाही. आचारसंहितेचा या अनुदान वितरणाशी काहीही संबंध नाही, असे राज्य निवडणूक आयोगाकडून सांगण्यात आले.

## नगरसेवकांसहीत १६ जण भाजले! धक्कादायक व्हिडीओ समोर


# जेजुरीत उधळलेल्या भंडाऱ्याने घेतला पेट

■पुणे। प्रतिनिधी,

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल रविवारी जाहीर झाले. महायुतीने या निवडणुकींमध्ये मोठा विजय मिळवला. या विजयाचा जागोजागी जल्लोष करण्यात आला. मात्र पुण्यातील पुरंदरमधील जेजुरी गडाच्या कमानीजवळ जल्लोषादरम्यान एक अत्यंत विचित्र प्रकार घडला. उत्सहात जल्लोष सुरु असताना अचानक आगीचा भडका उडाला आणि एकच गोंधळ झाला.

### तिथं घडलं काय?

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर राष्ट्रवादीचे दोन विजयी उमेदवार जेजुरी गडावर दर्शनासाठी गेले होते. त्यावेळी त्यांच्यासोबत समर्थकांची मोठी गर्दी होती.





**१६ ते १७ जण भाजले :** नवनिर्वाचित नगरसेवकांच्या विजयी मिरवणुकीमध्ये उमेदवारांचे औक्षण सुरु असतानाच हा प्रकार घडल्याने एकच गोंधळ उडाला. या आगीच्या भडक्यात जवळपास १६ ते १७ जण भाजले असल्याची भीती नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे. सुदैवाने कोणालाही गंभीर इजा झाली नाही.

अनेक समर्थकांनी जेजुरी गडाच्या पायऱ्या सुरु होतात तेथील कमानीवर जाऊन या नगरसेवकांवर भंडारा उधळण्याच सुरुवात केली. अनेकदा या कमानीवरुन खाली उभ्या असलेल्या सहकाऱ्यांवर आणि विजयी उमेदवारावर भंडारा उधळण्यात आला. त्याचदरम्यान खाली नगरसेवकांसोबत असलेल्या गर्दीतून काही महिला कार्यकर्त्या विजयी उमेदवारांचं औक्षण करण्यासाठी आरतीचं ताट घेऊन पुढे आल्या. मात्र वरुन खाली पडत असलेल्या भंडाऱ्याने या ताटातील ज्योतीतील आगीमुळे पेट घेतला आणि भडका उडाला.

### नेमकी कशामुळे लागली आग?

भेसळयुक्त भंडाऱ्यामुळे ही आग लागल्याचा दावा केला जात आहे. भेसळयुक्त भंडाऱ्यामध्ये खऱ्या हळदीपेक्षा रसायनं अधिक प्रमाणात असतात. त्यामुळेच हा भंडारा मोठ्या प्रमाणात आगीच्या संपर्कात आल्यास पेट घेण्याची शक्यता असते. असाच प्रकार रविवारी घडला. काही जणांनी विजयी उमेदवारांसोबत त्यांच्या सहकाऱ्यांच्या अंगावर आधीपासूनच गुलाल होता त्यामुळेच गुगालामधील रसायनांच्या परिणामुळे या काही क्षणांसाठी लागलेल्या आगीचा दाह त्यांच्यापर्यंत पोहोचला आणि त्यांना भाजल्याचा दावा केला जात आहे.

हा सारा घटनाक्रम विजयी जल्लोष साजरा करताना व्हिडीओ शूट करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मोबाईलमध्ये कैद झाला असून व्हिडीओ व्हायरल होतोय.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# उडता महाराष्ट्र नको...




वर्ष संपायला अवघे काही दिवस शिल्लक राहिलेत. त्यामुळे अनेकांनी थर्टीफर्स्ट साजरा करायचे प्लान आखले असतील. कुणी थंड हवेच्या ठिकाणी जाईल, तर कुणी समुद्रकिनारी... उरले सुरलेले मित्रमंडळी वा कुटुंबकबिल्यासहीत टेरेस किंवा हॉलमध्येच नवे वर्ष साजरे करतील. या निमित्ताने असंख्य स्पॉन्सर्ड पाटयार्ही आयोजित केल्या जातील. जिथे धनदांडगे लाखांचे तिकीट काढून मनमुराद मजा करतील. ३१ डिसेंबरच्या रात्री घडाळ्यात बाराचा ठोका पडताच, फसफसणारे पेले एकमेकांना भिडतील, धुरांच्या वलयांनी छताचे कोपरे काळवंडू लागतील. नव्या जमान्याच्या सेलिब्रेशनची ही नवी तऱ्हा. नवीन वर्षाच्या सुरुवातीला नवे संकल्प करत ते पूर्ण करण्याचे ध्येय ठेवणारे विरळच. उलट, थर्टीफर्स्टच्या रात्री नशेत धुंद होऊन वर्षाच्या पहिल्या दिवसाची संध्याकाळ किंवा थेट रात्र पाहणारेच आता अधिक झालेत. मध्यरात्रीच्या काळोखात रेव्ह पार्ट्यांच्या नावाखाली चालणारे ड्रग्ज-सेक्स रॅकेटचाही भांडाफोड होईल. त्याच्या बातम्यांनी दुसऱ्या दिवसांचे पेपर भरून जातील. मागच्या काही वर्षांमध्ये तरुणांना पोखरत असलेली ड्रग्ज ॲडिक्शनची कीड आणखीनच खोलवर घुसू लागली आहे. किमान मागच्या काही महिन्यांमध्ये झालेल्या छापेमारीवरून तरी हेच म्हणावे लागेल. महायुती सरकारच्या सत्ताकाळात मुंबईसह महाराष्ट्रातील वेगवेगळे जिल्हे मेफेड्रोन ड्रग्ज (एमडी) उत्पादनाची केंद्रे बनू लागल्याचे भयावह चित्र समोर येत आहे. वर्षाच्या सुरुवातीलाच सांगली जिल्ह्यात एका एमडी ड्रग्ज उत्पादन कारखान्याचा पर्दाफाश झाला होता. जिथे २४५ कोटी किमतीचे एमडी जप्त करण्यात आले होते. दाऊद इब्राहिमचा जवळचा सहकारी सलीम डोला याच्या देखरेखीखाली हा कारखाना चालवला जात होता. पाठोपाठ वर्ध्यातील कारखाना उद्धवस्त करून पोलिसांनी १२८ किलो एमडी जप्त केले. मुंबईला लागून असलेल्या मीरा-भाईंदर, नालासोपारा परिसरातूनही असेच अनेक कारखाने उद्धवस्त करण्यात आले आणि आता अलीकडेच साताऱ्यात एका शेडमध्ये सुरू असलेल्या कारखान्याचाही पोलिसांनी छडा लावला. सध्या या प्रकरणावरून महाराष्ट्रात जोरदार राजकारण सुरू आहे. त्याकडे आपण वळूच परंतु, एका अहवालानुसार मागच्या १० महिन्यांमध्ये अंदाजे १५ हजार कोटी रुपयांचे एमडी ड्रग्ज, रसायने, साहित्य पोलिसांनी विविध ठिकाणी छापेमारी करून जप्त केले आहे. हा आकडा केवळ डोके चक्रावणाराच नाही तर समाजाला चिंतेत टाकणाराही आहे. गेल्या वर्षीदेखील पुण्यातले एमडी ड्रग्ज रॅकेटही असेच गाजले होते. सध्या ज्या ड्रग्ज रॅकेटवरून राजकारण तापलेय ते रॅकेट आहे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दरे गावच्या शेजारील सावरी गावचे. इथे मुंबई पोलिसांनी छापेमारी करून सुमारे १५० कोटी रुपयांचे एमडी ड्रग्ज जप्त केले. एका लहानशा शेडमध्ये हा कारखाना सुरू होता. ज्या जागेत हा कारखाना सुरू होता, त्या जागेचा सातबारा एकनाथ शिंदे आणि त्यांचे बंधू प्रकाश शिंदे यांच्या नावावर असल्याचा विरोधकांचा दावा आहे. या जागेपासून अवघ्या काही मिनिटांच्या अंतरावर प्रकाश शिंदे यांचे एक रिसॉर्ट कम रेस्टॉरंटही आहे. या रेस्टॉरंटमधून ड्रग्ज बनवण्याचे काम करणाऱ्या कामगारांना जेवण जायचे, त्यामुळे शिंदे कुटुंबाचे या रॅकेटशी लागेबांधे असल्याचा आरोप करत विरोधकांनी रान उठवून दिले आहे. परंतु ही जागा दरे गावचे सरपंच रणजीत शिंदे यांना काही महिन्यांपूर्वी वापरायला दिली होती, असे म्हणत प्रकाश शिंदेंनी आपले हात वर केलेत. तर, पोलिसांनीही रणजीत शिंदेंचे या प्रकरणाशी काही कनेक्शन नसल्याचा खुलासा केला. या प्रकरणाला अनेक पैलू आहेत. एक तर मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने साताऱ्यात जाऊन केलेली ही कारवाई राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ग्रीन सिग्नलशिवाय झालेली नाही. म्हणजेच त्यांनी आपल्या कॅबिनेटमधील सहकाऱ्यापासून लपवून त्यांच्याच जागेत ही कारवाई करायला पोलिसांना आदेश दिले होते, हे स्पष्ट होते. पोलिसांनी या कारखान्यात काम करणाऱ्या ३ कामगारांना अटक केली खरी, परंतु रणजीत शिंदेंची चौकशी करून त्यांना सोडून दिले. महाराष्ट्रात आतापर्यंत कधीच कुठल्याही मंत्र्यावर ड्रग्ज रॅकेटमध्ये सहभागी असल्याचा आरोप झालेला नाही. कारण हा अत्यंत गंभीर आरोप आहे. भलेही शिंदे बंधू या प्रकरणात सहभागी नसतील, तरी पोलिसांनी त्यांची चौकशी करायला हवी. ज्यांच्यावर आरोप झाले ते रणजीत शिंदे शिवसेनेचे तालुकाध्यक्ष असून प्रकाश शिंदे माजी नगरसेवक आहेत. त्यामुळे एकनाथ शिंदेंनाही या प्रकरणाशी माझा संबंध नाही म्हणत हात वर करता येणार नाहीत. पोलिसांनीही या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करायला हवी. महामुंबईत दर दिवसाआड एमडी ड्रग्जची तस्करी करणाऱ्यांना पकडले जाते. त्यांच्याकडून लाखो रुपये किमतीचे ड्रग्जही जप्त केले जाते. परंतु आता ड्रग्जची ही मुळे गावखेड्यांच्या जमिनीत घुसू लागली आहेत. महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांमध्ये सापडत असलेल्या ड्रग्जच्या साठ्यांवरून समाजामध्ये व्यसनाधीनता वाढत चालल्याचे सिद्ध होत आहे. एमडी ड्रग्ज बनवायला सोपे असल्यामुळे त्याचे उत्पादन वाढू लागल्याची कबुली देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली होती. परंतु त्यांना या ड्रग्ज उत्पादन आणि तस्करीला आळा घालण्यात अद्याप यश आलेले नाही. कमी वयाची मुले अमली पदार्थांकडे ओढली जात आहेत. पूर्वी ३० वर्षांपुढील तरुणांची संख्या मोठी असायची. आता १३-१४ वर्षांपासून ते पंचविशीपर्यंतचे तरुण मोठ्या प्रमाणात आढळून येतात. दुसरी गोष्ट म्हणजे, पूर्वी व्यसन हे प्रामुख्याने मुलांमध्ये दिसायचे, आता मुलींमध्येही व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत आहे. सिगारेट ओढणे, दारू पिणे, ड्रग्ज घेणे या सवार्ला सोशल ॲक्सेप्टन्स किंवा सार्वजनिक मान्यता मिळणे हीदेखील सामाजिकदृष्ट्या अत्यंत चिंतेची बाब आहे. कधीकाळी दारू पिणाऱ्या माणसाकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन नकारात्मक असायचा, आता याउलट स्थिती दिसते. जो व्यसन करत नाही तो कमजोर आणि पुढारलेल्या जगापासून लांब आहे, असे म्हटले जाते. काही वर्षांपूर्वी याच व्यसनाधीनतेने पंजाबमधील लाखो तरुणांचे जीवन वाया गेले. म्हणूनच पंजाबप्रमाणे उडता महाराष्ट्र व्हायला नको, यासाठी सरकारने सतर्क राहायला हवे.

# तेव्हा कुठे जातो स्त्री सन्मान?



काही दिवसांपूर्वी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी पाटलीपुत्र (पाटणा) येथे नवनियुक्त 'आयुष' डॉक्टरांना नियुक्तीपत्रे प्रदान करतांना युनानी डॉ. नुसरत परवीन यांचा हिजाब खेचला. विरोधी पक्ष राष्ट्रीय जनता दलाकडून हा व्हिडिओ सामाजिक माध्यमांवरून प्रसारित झाल्यावर हा प्रकार देशभरात झपाट्याने पसरला. यामुळे विरोधी पक्षासह सामाजिक माध्यमांवरूनही मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यावर मोठ्या प्रमाणात टीका झाली. या धक्क्यामुळे डॉ. नुसरत परवीन यांनी बिहारमध्ये नोकरी करण्यास नकार दिल्याच्या बातम्या वृत्तपत्रांमध्ये आल्या आहेत. 'शालेय जीवनापासून वैद्यकीय सेवेत रुजू होईपर्यंत मी नियमित हिजाब घालत आहे; परंतु असा अनुभव मला प्रथमच आला', अशी डॉ. नुसरत परवीन यांची भावनिक प्रतिक्रियाही माध्यमांनी छापली. एखाद्या महिलेचा हिजाब ओढणे आणि तेही सार्वजनिक ठिकाणी असे करणे, हे मुख्यमंत्रीपदावरील व्यक्तीला शोभनीय नाही. या प्रकारानंतर राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस आदी विरोधी पक्षांच्या नेत्यांनी नितीश कुमार यांच्यावर सपाटून टीका केली आहे. काँग्रेसने टीका करतांना नितीश कुमार यांच्या या कृत्याला 'निर्लज्जपणा', 'नीच कृत्य' असे म्हटले आहे. 'ते क्षमा मागण्याच्या पात्रतेचेही नाहीत', असे म्हणत काँग्रेसने नितीश कुमार यांनी मुख्यमंत्रीपदाचे त्यागपत्र देण्याची मागणी केली आहे. नितीश कुमार यांच्या या कृत्याचे कधीही समर्थन होऊ शकत नाही; कारण भारतीय संस्कृती स्त्रियांचा आदर करण्याची शिकवण देते. त्यामुळे काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल किंवा अन्य विरोधी पक्षांनी केलेली टीका काही वावगे नाही; परंतु मुसलमान स्त्रीचा हिजाब ओढणे, हा तिचा अपमान ठरत असेल, तर स्त्रीच्या अब्रूला हात घालणे, हा तर त्यापेक्षा मोठा अपराध आहे, हे मान्य करावेच लागेल. अशा अपराधाला मृत्यूदंडाचीच शिक्षा व्हायला हवी, नव्हे का ? नितीश कुमार यांची मुसलमान स्त्रीचा हिजाब ओढण्याची कृती ही चुकीचीच आहे; परंतु स्त्री कोणत्या धमार्ची आहे, यावरून जर कुणी तिच्या सन्मानाचा स्तर ठरवत असेल, तर तो त्याहीपेक्षा मोठा अपराध आहे. काँग्रेस, साम्यवादी आणि तथाकथित पुरोगामी मागील अनेक वर्षांपासून हा अपराध करत आहेत. एका मुसलमान महिलेच्या चेर्हयावरील हिजाब ओढल्यावर जे स्त्री सन्मानाची भाषा करतात, तेच लव्ह जिहादच्या जाळ्यात सहस्रो हिंदु युवतींवर अत्याचार झाले, तरी तोंडातून चकार शब्दही काढत नाहीत. तेव्हा कुठे जातो यांचा स्त्री सन्मान ?

### हिंदु कि मुसलमान यांवरून महिला सन्मान ठरतो ?


'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' या धर्मांध संघटनेने हिंदु धमार्तील ब्राह्मण, गुजराती, जैन, शीख, मराठी आदी समुहानुसार हिंदु युवतींना लव्ह जिहादमध्ये फसवण्यासाठी 'रेट कार्ड' घोषित केले आहे. काही वर्षांपूर्वी लव्ह जिहादच्या प्रकरणात अटक झालेल्या मुसलमान युवकाकडेही 'रेट कार्ड' आढळून आली. त्या वेळी काँग्रेस किंवा साम्यवादी यांना महिलांचा सन्मान आठवला नाही. डॉ. नुसरत परवीन यांच्या सन्मानाच्या गोष्टी हे काँग्रेसचे केवळ न केवळ ढोंग आहे. काँग्रेसला जर खरोखरच महिलांच्या सन्मानाची चाड असती, तर लव्ह जिहादमध्ये अडकलेल्या हिंदु युवतींना न्याय मिळावा, यासाठीही काँग्रेसने आवाज उठवला असता. लव्ह जिहादचे प्रकार होऊ नयेत, यासाठी कायदा करण्याची मागणी केली असती; परंतु महिला हिंदु कि मुसलमान ? यावरून काँग्रेसचा महिला सन्मान ठरतो.

### राजकीय सूत्रावरून स्त्री सन्मान ठरतो का ?

वर्ष २०१४ मध्ये झारखंड येथील राष्ट्रीय नेमबाज तारा सहदेव यांच्याशी 'रणजित कुमार कोहली' या खोट्या नावाने रकीबुल हसन या मुसलमानाने हिंदु पद्धतीने विवाह केला. विवाहानंतर काही दिवसांनी तो मुसलमान असल्याचे तारा सहदेव यांच्या लक्षात आल्यावर त्या न्यायालयात गेल्या. तब्बल ९ वर्षे तारा सहदेव यांनी न्यायालयीन लढा दिला. शेवटी वर्ष २०२३ मध्ये त्यांना फसवर्णाया रकीबुल हसन याला विशेष सीबीआय न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा दिली. या प्रकरणातही काँग्रेसने मौन बाळगले. अशा प्रकारे हिंदु महिला आणि युवती यांच्यावरील अत्याचाराची देशभरात दिवसागणिक कितीतरी प्रकरणे उघड होत आहेत; मात्र अत्याचार करणारे मुसलमान असल्यामुळे त्यांचा हिंदु महिलांवरील अत्याचार काँग्रेसला क्षम्य वाटत असावा. राजकीय लाभाची गोळा-बेरीज करून स्त्री सन्मानाची भूमिका ठरवणारा हा काँग्रेसचा निर्लज्जपणा आहे.

त्याहीपुढे काँग्रेस किती निर्लज्ज आहे, याची कितीतरी उदाहरणे सापडतील. डॉ. नुसरत परवीन यांचा हिजाब ओढणारे नितीश कुमार हे राजकीय शत्रू आहेत, यासाठीच काँग्रेस टीका करत आहे. डॉ. परवीन यांचा अपमान कुणी मुसलमानानेच केला असता, तर मात्र काँग्रेसच्या नेत्यांनी तोंडातून शब्दही काढला नसता. वर्ष २०१५ मध्ये उत्तराखंडमधील शायरा बानो या मुसलमान महिलेला रिझवान अहमद या तिच्या नवऱ्याने पत्राद्वारे ३ वेळा 'तलाक' कळवून घटस्फोट दिला. या विरोधात शायरा बानो न्यायालयात गेल्या, तेव्हा काँग्रेसने त्यांना समर्थन दिले नाही. उलट वर्ष २०१९ मध्ये भाजप शासनाने 'तिहेरी तलाक'च्या विरोधात 'मुसलमान महिला (विवाहावरील हक्कांचे संरक्षण) कायदा' आणला त्या वेळी काँग्रेसने साळसूद भूमिका घेतली. या कायद्याद्वारे तोंडी, लेखी, 'एस्.एम्.एस्.' (लघुसंदेश) किंवा व्हॉट्सॲप यांद्वारे तिहेरी तलाक रहित करण्यात आले. या वेळी मुसलमान महिलेवरील अन्यायापेक्षाही काँग्रेसला मुसलमान समाजाची 'व्होट बँक' (एकगठ्ठा मते) महत्त्वाची होती. काँग्रेसला मुसलमान महिलांच्या सन्मानाची नव्हे, तर मुसलमानांच्या मतांचे पडले आहे, हेच यावरून दिसून येते.

काँग्रेसची ही परंपरा आताची नाही. वर्ष १९७८ मध्ये मध्यप्रदेश येथील ६२ वर्षीय शाहबानो बेगम या मुसलमान महिलेला त्यांचे पती महंमद अहमद खान यांनी लग्नाच्या ४० वर्षांनंतर तिहेरी तलाक दिला. त्या वेळी त्यांना ५ मुले होती. 'मुस्लिम पर्सनल लॉ'नुसार घटस्फोटानंतर केवळ ३ मास पोटगी देता येते; परंतु सर्वोच्च न्यायालयाने भारत धर्मनिरपेक्ष देश असल्याचे नमूद करत महंमद खान यांना शाहबानो यांना पोटगी देण्याचा निर्णय दिला. मुसलमानांच्या मतांसाठी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी वर्ष १९८६ मध्ये 'मुस्लिम महिला (घटस्फोट हक्क संरक्षण) कायदा' संमत करून तिहेरी तलाकला संरक्षण दिले. या कायद्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने शाहबानो यांना दिलेला निर्णय आपोआप रहित झाला. केवळ मुसलमानांच्या मतांसाठी राजीव गांधी यांनी एका वृद्ध आणि असाहाय्य महिलेचाही सन्मान राखला नाही. अशा परंपरेच्या काँग्रेसला डॉ. नुसरत परवीन यांच्या सन्मानाची नाही, तर मुसलमानांच्या मतांची चिंता आहे, हे लक्षात घ्या. प्रश्न हिजाबचा असो, तीन तलाकचा असो वा मुसलमान लांगूलचालनाचा असो, भारतामध्ये धर्मांधतेला वेळीच ठेचणे, हाच त्यावरील एकमात्र उपाय होय!



# कोकणातही पसरली बिबट्यांची दहशत

**वन्यप्राणी रस्त्यावर आलेत. याची अनेक कारणं असली तरी, जंगलाला रानमोडी वनस्पतीने घातलेला वेढा हे देखील एक प्रमुख कारण आहे. रानमोडीने जंगलातील अनेक झाडं-झुडपं नष्ट केली आहे. रानमोडी पसरल्यावर कोणत्याही भागातील अन्य झाडांवर अतिक्रमण होतं आणि एकदा रानमोडी पसरली की, आपोआपच परिसरातील इतर झाडं नष्ट होतात ही वस्तुस्थिती आहे. कोकणातील जंगलांमध्ये आता रानमोडीच वाढलेली दिसते. बाकीची सगळीच झाडं आणि झुडपांच्या जागी रानमोडी मोठ्या प्रमाणावर वाढलेली दिसते. रानमोडीच्या अतिक्रमणामुळेही जंगलातील वन्यप्राणी जंगल सोडून गावो-गावच्या मानवी वस्तीकडे आले आहेत. बिबटे तर एवढे वाढले आहेत, की आज कोकणातील पालघरपासून सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील बांद्यापर्यंत बिबटे दिसतात. कधी कोणाच्या अंगणात, तर कधी घराशेजारी, कधी गुरांच्या गोठ्यात, तर कधी अगदी भरदिवसा बिबट्या रस्त्यावर फिरताना दिसून येतो...**

महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये वन्यप्राण्यांनी जंगल सोडून मानवी वस्तीत प्रवेश केला. कोकणात तर हत्ती, बिबटे, गवारेडे आदी वन्यप्राण्यांनी कोकणातील ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांचे जगणेच हैराण करून सोडले आहे. कोकणातील पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या चारही जिल्ह्यांमध्ये दिवसा-ढवळ्या वन्यप्राणी महामार्गावर फिरताना आढळून येत आहे. पंधरा-वीस वर्षांपूर्वी बिबट्याचे दर्शन दुर्मीळ होते. फार क्वचित कुठल्यातरी जंगलाच्या शेजारच्या एखाद्या गावात वाघाची डरकाळी कानी पडायची. तेव्हा कुठे गावात चर्चा व्हायची, 'जंगलात वाघ इलो असो वाटता'. आज-काल वाटण्याचा विषयच नाही. बिबट्यांचा तर गावो-गावी मुक्त संचारच असतो. ग्रामीण भागातील अनेकवेळा रात्री आणि दिवसाच्या प्रवासातही बिबट्या रस्ता अडवून बसलेला असतो. पाणवठ्याच्या जागांवर, नदी, ओढ्यांच्या किनाऱ्यावर बिबट्या हमखास पाणी प्यायला येतो. काही गावकुसाबाहेर वन्यप्राणी पाणी प्यायला येण्याच्या काही खास जागाही आहे. या पाणीसाठा असणाऱ्या ओढ्यांवर हमखास वन्यप्राणी असतातच. पूर्वीच घनदाट असणार कोकणातील जंगल आज विरळ होत गेलंय. जंगलातील जुनाट मोठे वृक्ष, जंगली फळ देणारी झाडं आज फारशी कुठे दिसत नाहीत. तेथे जंगल वाढलेय ते रानमोडीने. साहजिकच यामुळे कोकणातील पूर्वीची जंगले कुठे दृष्टीस पडत नाही. पक्षी आणि माकडं सारेच त्यांच्या-त्यांच्या भागातून स्थलांतरीत झाले आहेत.

माकडांनी तर वस्तीतच ठाण मांडले आहे. गावो-गावच्या वस्तीत तर झाडांवर माकडे दिसतात. एवढच कशाला गावातील घराशेजारील झाडांवर असणारी माकड झाडांवरून थेट घरात कधी प्रवेश करतात हेच मुळी कोणाला कळत नाही. घरातील माणसं शेतात कामाला जातात. घरामध्ये कोणाचीही चाहूल लागत नाही, घरात कोणीच नाही. हे पाहून माकडं घरात शिरतात. शेतात कामासाठी जाणारी शेतकरी लोक शेतात कामाला जाताना जेवण तयार करून ठेवतात आणि शेतात जातात. कोणत्या तरी मार्गाने माकड घरात प्रवेश करतात आणि तयार करून ठेवलेल्या जेवणाचा फडशा पाडतात. अनेक कुटुंबीयांनी माकडांचा हा अनुभव घेतला आहे. हा प्रकार ग्रामीण भागातच घडतोय असे नव्हे तर शहरी भागातही असेच अनेकांना अनुभव आलेले आहेत. एवढच कशाला अनेक बंगल्यात थेट प्रवेश करून माकड डायनिंग टेबलवर ठेवलेल्या फळांची नासधूस करतात याची चर्चा अनेकवेळा कानावर येते. त्यामुळे कोकणातील सर्वसामान्य, शेतकरी या वन्यप्राण्यांच्या मुक्त संचाराने पूर्ण हैराण आहेत. वन्यप्राणी रस्त्यावर,गावात शिरायला अनेक कारण आहेत. त्यात जंगलाला रानमोडी वनस्पतीने घातलेला वेढा हे देखील प्रमुख कारण आहे. रानमोडीने जंगलातील अनेक झाडं-झुडपं नष्ट केली आहेत.

रानमोडी पसरल्यावर कोणत्याही भागातील अन्य झाडांवर अतिक्रमण होत आणि एकदा रानमोडी पसरली, की आपोआपच परिसरातील इतर झाडच नष्ट होतात. ही वस्तुस्थिती आहे. कोकणातील जंगलांमध्ये आता रानमोडीच वाढलेली दिसते. बाकीची सगळीच झाडं आणि झुडपांच्या जागी रानमोडी मोठ्या प्रमाणावर वाढलेली दिसते. रानमोडीच्या अतिक्रमणामुळेही जंगलातील वन्यप्राणी जंगल सोडून गावो-गावच्या मानवी वस्तीकडे वळत आहेत.

बिबटे तर एवढे वाढले आहेत, की आज कोकणातील पालघरपासून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांद्यापर्यंत बिबटे दिसतात. कधी कोणाच्या अंगणात तर कधी घराशेजारी, कधी गुरांच्या गोठ्यात तर कधी अगदी भरदिवसा बिबट्या रस्त्यावर फिरताना दिसून यायला लागले. बऱ्याचवेळा बिबट्या गावातील विहिरीत पडल्याचे देखील आपण ऐकले, पाहिले आहे. बिबट्या विहिरीत पडण्याविषयी कोकणातील विविध विषयांचे अभ्यासक सेवानिवृत्त प्रा. जी. ए. सावंत यांनी तर यावर एक विश्लेषण केलंय, त्यांनी सांगितल, की कोकणात विहिरीत बिबट्या पडतो यामागच कारण असं आहे, कोकणातील लोकांप्रमाणेच कोकणातील कुत्रेही भयंकर हुशार असतात. गावात जेव्हा बिबट्या येतो तेव्हा बिबट्याची पहिली शिकार ही गावात फिरणारी कुत्री असतात. यामुळे गावातील हे भटके कुत्रे बिबट्याच्या नजरेस पडले की बिबटे या कुत्र्यांचा पाठलाग करतात. कुत्रे बरोबर पाठलाग करणाऱ्या बिबट्यांना विहिरीशेजारी घेऊन येतात. बिबट्यांना अंदाज येत नाही. परंतु त्या कुत्र्यांना मात्र विहीरीचा अंदाज असतो. अशातच कुत्रे सहीसलामत बिबट्यांच्या तावडीतून सुटतात; परंतु बिबटे मात्र विहिरीत पडतात. यातल्या गंमतीचा भाग सोडला तरीही अनेकवेळा कोकणातील विविध भागांत बिबटे विहीरीत पडतात ही वस्तुस्थिती आहे. त्याच नेमकेपणाने कारण कोणतेही असले तरीही बिबट्याच विहिरीत पडण्याचं प्रमाणही काही कमी नाही.

आज शासनस्तरावर हत्ती, बिबटे, माकड यांचा बंदोबस्त करण्यासाठी केले जाणारे प्रयत्न आणि उपाय कितीही होत असले तरीही शेतकऱ्यांना या वन्यप्राण्यांपासून होणारा त्रास काही कमी होत नाही. पूर्वी गावातील वाडी-वस्तीत गावकरी सहजपणे फिरत असत. आज तशी स्थिती राहिलेली नाही. गावातून फिरतानाही काळजी घेत जीव मुठीत धरूनच गावात शेतकऱ्यांना फिरावे लागत आहे.

# युद्धासाठी आता ३ आघाड्या



बांगलादेशात गेल्या दीड वर्षापासून धुमाकूळ घालणाऱ्या हिंसक आंदोलकांचा नेता शरीफ ओस्मान हादी याला अज्ञातांनी ढाकामध्ये ठार केले. त्यानंतर हिंसक धर्मांधांचे जथ्थे पुन्हा एकदा हैदोस माजवत असल्याचे पहायला मिळत आहे. बांगलादेशाने त्याच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना मानवतेविरुद्ध गुन्हा केल्यावरून मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली असल्यावरून बांगलादेश भारतावर सातत्याने दबाव आणत हसीना यांना परत करण्याची मागणी करत आहे. अशातच हादी याची हत्या झाल्यानंतर यात विदेशी शक्तींचा हात असल्याचे सांगत अप्रत्यक्षरित्या त्याचा भारताशी संबंध जोडण्याचा प्रयत्न बांगलादेशातील कट्टरतावादी धर्मांध करतांना दिसत आहेत. त्याचाच परिणाम म्हणून १७ डिसेंबरला हिंसक आंदोलकांच्या एका म्होरक्याने ईशान्य भारतातील ७ राज्यांना देशापासून तोडण्याची चिथावणी दिली आणि त्याच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे १८ डिसेंबरला सहस्रो धर्मांधांनी ढाका येथील भारतीय दूतावासाला घेरले आणि आक्रमण करण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी भारतापासून ईशान्य भारत वेगळा करण्याचे दिवास्वप्न नॅशनल सिटीझन पार्टीचे हसनत अब्दुल्ला यांना पडले. फुटकळ नेत्याची ही विधाने भारतासारख्या सिंहाने गांभीयार्ने घ्यावी, अशी नाहीतच. तरीही अडीच आघाड्यांवर लढत असलेल्या भारताला आजच्या स्थितीत याचा विचार करावा लागणार आहेच.

स्वातंत्र्यापासून भारत पाकच्या विरोधात लढत आहे. सरळ युद्ध करू न शकणारा पाक आतंकवाद्यांना हाताशी धरून भारतविरोधी कारवाया करत आहे. दुसरीकडे भारताला विस्तारवादी चीनशी कधी मुत्सद्दीपणे, तर कधी कठोरतेने आवरता आवरता नाकी नऊ आले आहेत. अक्साई चीन गेला, तर आणखी कोणता प्रदेश चीनने गिळंकृत करू नये, यासाठी भारत प्रयत्नरत आहे. त्यातच देशांतर्गत अस्थिरता निर्माण करण्यासाठी काँग्रेसही आटापिटा करत आहे. भारतात चालू असलेल्या विशेष सखोल पुनरावलोकन प्रक्रियेत ३ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेश असे मिळून १ कोटी जणांची नावे मतदारसूचीतून बाद होणार असल्याचे पुढे आले. बंगालमध्ये पुनरावलोकन प्रक्रियेला राज्य सरकारकडूनच मोठा विरोध आहे आणि एकट्या बंगालमधील बाद होऊ शकर्णाया मतदारांची संख्या ५० लाखांहून अधिक आहे. बंगालमधील बांगलादेशी घुसखोरांना तृणमूल काँग्रेसच्या ममता (बानो) बॅनर्जी सरकारचाच पाठिंबा असल्याने पुनरावलोकन प्रक्रियेला विरोध होत आहे, हे शेंबडे पोरही सांगेल. अशातच काँग्रेसकडून पुन्हा एकदा पंतप्रधान मोदी यांना गाडण्याच्या धमक्या देणे चालू झाले आहे. भारताच्या विरोधातील या अंतर्गत अर्ध्या आघाडीलाही तोंड द्यायचे आहे. पाकिस्तान, चीन, देशांतर्गत विरोध अशा अडीच आघाड्यांसह आता बांगलादेशाची परिस्थिती पहाता अर्धी आघाडी अजून वाढली आहे.

बांगलादेशातील हादीसारख्या नेत्याच्या मृत्यूनंतर जो हिंसाचार उफाळला आहे, तो भारतासाठी केवळ शेजारील देशातील भांडण नाही, तर राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न आहे. बांगलादेशातील अस्थिरतेचा लाभ घेऊन चीन तेथे पाय रोवू पहात आहे आणि पाकिस्तान हिंसक आंदोलकांना फूस लावत आहे. १६ डिसेंबर १९७१ या दिवशी पाकिस्तान शरण आला आणि बांगलादेशाची निर्मिती झाली. या प्रक्रियेत भारताने मोठ्या भावाची भूमिका बजावली खरी; परंतु आता भारताला मोठ्या भावाची भूमिका सोडून एका शक्तीशाली राष्ट्राप्रमाणे वागावे लागेल. जर बांगलादेशातील फुटकळ नेतेही भारताची राज्ये तोडण्याची भाषा करत असतील आणि तेथील अराजकता भारताच्या सीमा ओलांडून आत येत असेल, तर भारताने 'प्रो-ॲक्टिव्ह' होऊन कारवाई करण्यास कचरणार नसल्याचे स्पष्ट संकेत दिले पाहिजेत.

### बांगलादेशाला लोकशाही नकोच!

बांगलादेश लोकशाही मार्गानुसार निवडणुका घेणार, असे वरवर चित्र दिसत असले, तरी 'प्रोथोम अलो'सारख्या वृत्तपत्राच्या कार्यालयावर झालेले आक्रमण आणि सातत्याने चालू असलेली सार्वजनिक मालमत्तेची हानी पहाता आंदोलकांना लोकशाही नको आहे. त्यांना बांगलादेश धुमसत ठेवून भारताला अस्थिर करायचे आहे, यात कोणतीही शंका नाही. ढाका येथील भारतीय दूतावासावर आक्रमणाच्या वेळी एका हिंदूवरही आक्रमण झाले. धर्मांधांना भारताला जेरीस आणायचे असल्याने हादीच्या हत्येचे निमित्त साधून बांगलादेशातील हिंदूंवर अत्याचार करण्याचा त्यांना परवाना मिळाल्याप्रमाणे तेथील हिंदूंना आता त्रास देऊ लागतील. बांगलादेशाला लोकशाही हवी असती, तर तेथे हिंदूंवर अत्याचार झालेच नसते. बांगलादेशातील अंतरिम सरकार हे या जिहादी तत्त्वांना आवर घालण्यात अपयशी ठरले आहे कि मुद्दामहून पाठबळ देत आहे ? असा प्रश्न आहे.

बांगलादेशातील भारतपूरक अवामी लीगच्या वर्चस्वाचा अस्त, हिंसक धर्मांधांनी केलेला सत्तापालट, तेथे झालेले इस्लामी शक्तींचे पुनरागमन आणि चीन-पाकिस्तानचा तेथील वाढता प्रभाव या सर्व गोष्टी निर्णायक वळण दर्शवतात. बांगलादेशातील आजची परिस्थिती पहाता या समस्येचे घोंगडे जितके भिजत ठेवणार, तेवढी समस्या हाताबाहेर जाणार, हे लक्षात घ्यावे. शांतताकाळात घाम गाळला, तर युद्धकाळात अल्प रक्त सांडते! यानुसार शांतताकाळ उलटून आता संघर्षाचा काळ असला, तरी भारताने बांगलादेशी समस्येसाठी कष्ट घेणे आवश्यक ठरते. भारताला स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतर अजूनही पाकव्याप्त भारत, अक्साई चीन परत मिळवता आलेला नाही. आता 'ईशान्य भारत हातचा गेला', असे होऊ नये, यासाठी थेट कृती आवश्यक आहे. ती करावी, हेच भारतासाठी हितावह आहे. जे लोक भारताचा नकाशा पालटण्याचे स्वप्न पहात आहेत, त्यांना भारताने त्याच भाषेत उत्तर दिले पाहिजे. भारत अण्वस्त्रसज्ज आहे, असे नुसते म्हणून चालणार नाही. अण्वस्त्रांवर गंज चढू नये, हेही पाहिले पाहिजे. तसे केले नाही, तर पाकव्याप्त काश्मीर, अक्साई चीन यांच्याप्रमाणे ईशान्य भारत हातचा जायला वेळ लागणार नाही.

### छत्रपती शिवाजी महाराज

छत्रपती शिवाजी महाराज केवळ मूठभर मावळ्यांसह एकावेळी ५ पातशाह्यांविरुद्ध लढत होते. छत्रपती शिवाजी महाराज कुणीतरी आक्रमण करील; म्हणून कधीही थांबले नाहीत. मोगलांनी कह्यात घेतलेला एकेक प्रदेश त्यांनी सोडवला आणि स्वराज्यात समाविष्ट केला. त्यांची शत्रूच्या विरोधातील नीती अत्यंत अद्भुत होती. गनिमी कावा, आक्रमण, शह, संधी असे नाना प्रकार अवलंबून त्यांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. हिंदवी स्वराज्याच्या भक्कम पायावर अटक ते कटक असे स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर झाले. आता तर भारताच्या हाताशी सर्वोत्तम सैन्य, यंत्रणा, तंत्रज्ञान आहे. त्यामुळे भारताने आताच्या परिस्थितीत केवळ मुत्सद्दीपणाचा अवलंब न करता आक्रमक नीती वापरून तीनही आघाड्यांवर विजय मिळवावा. तर आणि तरच भारत सार्वभौम विश्वगुरु म्हणून उभा राहू शकतो.

# खूप प्रयत्न करूनही येत नाही शांत झोप







व्यायाम करणे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशी ठरते. यामुळे आपलं शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी मदत होते. परंतु तुम्हाला माहीत आहे का? व्यायामाचा संबंध फक्त आपल्या शारीरिक आरोग्यावर नाही तर झोपेसोबतही असतो. असं आम्ही सांगत नसून काही दिवसांपूर्वी करण्यात आलेल्या संशोधनातून असं सिद्ध झाले आहे. एका नव्या संशोधनातून असा दाव करण्यात आला आहे की, जे तरूण फिजिकली ॲक्टिव्हिटीमध्ये सहभागी असतात. ते एक्सरसाइज न करणाऱ्यांच्या तुलनेत जास्त वेळ आणि उत्तम पद्धतीने झोप घेतात.

**एक्सरसाइज केल्याने रात्री १० मिनिटं जास्त झोपतात**

सायन्टिफिक रिपोर्ट्स नावाच्या जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या या संशोधनामध्ये संशोधनकर्त्यांना असं आढळून आलं की, अशा तरूण व्यक्ती ज्या प्रत्येक तासाला काही जास्त परिश्रमाची कामं करतात, ते रात्री १८ मिनिटं लवकर, १० मिनिटं जास्त आणि एक टक्के शांत झोप घेतात. पेन स्टेटच्या डेटा साइंटिस्त लिंडसे मास्टर म्हणतात की, 'शांत झोप येणं हे तरूणपणी अत्यंत अवघड असतं. कारण या दरम्यान झोप क्लासरूम परफॉर्मन्स, स्ट्रेस आणि इटिंग बिहेवियरमुळे डिस्टर्ब असते. याच गोष्टींवर हा रिसर्च लक्ष केंद्रित करतो. जर तरूण मुलांना प्रत्येक दिवशी जास्त एक्सरसाइज करण्यासाठी प्रोत्साहित केलं गलं तर रात्री त्यांना शांत झोप मिळण्यासाठी मदत होते.

**दिवसभरात आळस केल्याने रात्री झोप येत नाही**

संशोधनातून सिद्ध झालेले सर्व निष्कर्ष दिवसभरात जर तरूण निष्क्रीय राहत असतीस तर रात्री त्यांना शांत झोप लागत नाही. संशोधनमध्ये सहभागी झालेले प्रतिस्पर्धी जेव्ह दिवसभरामध्ये जास्त वेळेसाठी निष्क्रिय असतात. ते रात्रीच्या वेळी लवकर जोपतात आणि सकाळी उशीरा उठतात. पण त्यांची झोप पूर्ण होत नाही. म्हणजेच फिजिकल ॲक्टिव्हीटी आणि झोपेमध्ये संबंध असल्याचे स्पष्ट होते.

**वयाच्या १५ व्या वर्षी ४१७ लोकांना सहभागी करण्यात आलं होतं**

संशोधनासाठी संशोधकांनी ४१७ लोकांना सहभागी केलं होतं. जेव्हा या व्यक्ती १५ वर्षांच्या होत्या, त्यावेळी त्यांना एक्सीलेरोमीटर्स देण्यात आले होते. जे त्यांच्या मनगटावर आणि हिप्सवर बांधण्यात आले होते. जे एक आठवड्यापर्यंत त्यांची फिजिकल ॲक्टिव्हीटी आणि झोप यांच्यावर लक्ष ठेवण्याचे काम करत होते. या संशोधनाचा उद्देश हाच होता की, सहभागी झालेल्या लोकांकडून त्यांच्या वागणूकीबाबत विचारण्याऐवजी त्यांच्या शारीरिक हालचालिंब आणि झोपेवर लक्ष ठेवणे.

**टिप : वरील सर्व गोष्टी संशोधनातून सिद्ध झालेल्या असून आम्ही केवळ माहिती म्हणून वाचकांपर्यंत पोहोचवत आहोत. यातून आम्ही कोणताही दावा करत नाही. त्यामुळे कोणताही उपाय करण्याआधी तज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.**

# नेहमी वाईट नसतं वाढतं वय, असतात काही खास फायदेही !



वाढदिवसाला अनेकजण गमतीने म्हणतात की, आयुष्यातील एक वर्ष कमी झालं. मित्रही गमतीने 'अरे म्हातारा होतोय तू' अशा कमेंट करू लागतात. अनेकांना असा अनुभव आला असेल. सामान्यपणे आपण बघतो की, वाढत्या वयामुळे अनेकजण निराश होऊ लागतात. कारण वाढत्या वयाकडे लोक म्हातारणाशी जोडून बघतात. त्यामुळे कुणी जर वय विचारलं तर अनेकजण वय लपवण्याचा प्रयत्न करतात. पण मुळात वय वाढणं तुमच्या आरोग्यासाठीच नाही तर सौंदर्यासाठीही फार फायदेशीर असतं. तज्ञांनुसार तर याचा संबंध मेंदूच्या क्षमतेशी सुद्धा असतो.

- **आत्मविश्वास वाढतो :** वाढत्या वयासोबतच अनेक गोष्टी इम्प्रूव्ह होतात. त्यातील एक मुख्य गोष्ट म्हणजे आत्मविश्वास वाढणे. अनेकांना कमी वयात वेगवेगळ्या गोष्टी करण्यात अडचणी, भीती वाटत असते, अनेकांना स्टेजवर जाण्याची भीती वाटत होती, तर कुणाला इंटरव्ह्यूचं टेन्शन आलं असेल. पण जसजसं वय वाढत जातं, तुमचा आत्मविश्वास वाढत जातो.
- **सौंदर्य सुद्धा खुलतं :** जसजसं वय वाढत जातं त्याचा सर्वात जास्त प्रभाव त्वचेवर पडतो. वय वाढत असताना त्वचेवरील ऑईल दूर होत जासं आणि त्वचा ड्राय व चांगली होऊ लागते. वयानुसार, सेबेससियस ग्लॅंडमधून ऑइलचा स्त्राव कमी होतो. ज्यामुळे वाढत्या वयासोबत ऑइली त्वचेची समस्याही दूर होते.
- **स्मरणशक्ती :** जास्तीत जास्त लोकांची अशी धारणा असते की, वयानुसार मेंदूची क्षमता कमी होऊ लागते. पण इश्यू ऑफ सायकॉलॉजिकल सायन्सच्या एप्रिल २०१५ च्या रिसर्चनुसार, आपल्या कॉग्नीटिव्ह स्कील, ज्यात नाव, नवीन शब्द, माहिती लक्षात ठेवणे या क्षमता वयानुसार वाढत जाते. अभ्यासकांनुसार, विसरण्याची समस्या साठ वर्षांनंतर सुरू होते. हा रिसर्च ५० हजार लोकांच्या आयक्यू आणि मेमरी टेस्टवर केला होता. ज्यात लहान मुले, तरूण आणि वयोवृद्धांचा समावेश होता.
- **मायग्रेन होतो दूर :** वाढत्या वयासोबत मायग्रेनची समस्या ठीक होऊ लागते. यूनायटेड किंगडमच्या मायग्रेन ट्रस्टच्या मायग्रेन रिसर्च चॅरिटीनुसार, सर्वच केसेसमध्ये असं होत नाही, पण ४० टक्के लोकांचं असं मत आहे की, त्यांच्या वाढत्या वयासोबत त्यांची समस्या दूर झाली.
- **कमी झोप येणे :** वय वाढण्याचा सर्वात मोठा फायदा हा असतो की, तुमच्याकडे काम करण्यासाठी जास्त वेळ असतो. कारण वय वाढण्यासोबत झोप कमी येते. खासकरून एका वयानंतर दिवसा झोप येतंच नाही. ज्यामुळे काम करण्यासाठी तुम्हाला अधिक वेळ मिळतो.

# झोपण्याआधी प्या यूजफूल ड्रिंक... जिम न जाता पोटाची चर्बी होईल कमी



दिवसेंदिवस लठ्ठपणाच्या समस्या वाढतच चालल्या आहे. अनेक उपाय करूनही लोकांच वजन कमी होत नाही. तेव्हा तुम्ही या ड्रिंक ट्राय करायला हरकत नाही. त्याचे चांगेल रिजल्टही तुम्हाला बघायला मिळतील. तुमच्या रात्रीच्या आहारावर तुमचं वजन किती वाढू शकतं हे अवलंबून असतं. तेव्हा रात्री झोपण्यापूर्वी या दोन ड्रिंक ट्राय करण्याचे फायदे जाणून घ्या.

**हळदीचं दूध :** हळदीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे औषधी गुणधर्म आहेत.हळदीमध्ये प्रत्येक प्रकारचे न्यूट्रियंट्स असता. त्यामुळे वजन कमी करण्यास हळदीचं दूध फायदेशीर ठरते. झोपण्यापूर्वी या हळदीचं दूध पिल्यास चांगले रिजल्ट मिळतात.

**मेथीचा चहा :** जर तुम्हाला तुमच्या पोटाची चर्बी कमी करायची असेल तर आजच मेथीचा चहा प्यायला सुरूवात करा. हिवाळ्यात जास्त जेवण जेवल्याने तुमची पचनशक्ती बिघडते. मेथीचा चहा तुमची पचनशक्ती सुधारते. याला बनवण्यासाठी एक ग्लास पाणी घ्या त्यात एक चम्मच मेथी टाका. सकाळच्या वेळी हे पाणी गाळून घ्या आणि रात्री हलक गरम करून प्या. याचे तुम्हाला चांगले रिजल्ट्स मिळतील.

**या कारणाने वाढतं वजन :** रात्री निदान झोपण्याच्या दोन तासाआधी जेवायला हवं. त्यामुळे जेवण पचण्यास मदत होते. जेवन करून लगेच झोपणे आरोग्यासाठी हानिकारक आहे. त्यामुळे वजन वाढू नये यासाठी झोपण्याच्या दोन तासापूर्वी जेवण करणे गरजेचे आहे.








जर तुम्ही हेल्दी असाल आणि तरी सुद्धा तुम्हाला वजन कमी करायचं असेल किंवा फिट रहायचं असेल तर डेली डाएटमधून दररोज काही कॅलरी कमी करून तुम्ही वजन कमी करू शकता. तसेच कॅलरी कमी केल्याने तुमचं आरोग्यही चांगलं राहील. याआधी झालेल्या अनेक रिसर्चमधून ही बाब समोर आली आहे की, लो-कॅलरी डाएटचं सेवन करून आरोग्याशी संबंधित अनेकप्रकारच्या समस्या दूर होतात. अशात तुमचं वय वाढलं तरी तुम्ही तरूण दिसाल.

**डाएटमधून किती कॅलरी कमी कराव्या :** नुकत्याच झालेल्या एका नव्या रिसर्चमधून समोर आले आहे की, डेली डाएटमध्ये दररोज केवळ ३०० कॅलरी कमी करून शरीरात कलेस्ट्रॉलचं प्रमाण, ब्लड प्रेशरचं प्रमाण आणि ब्लड शुगरचं प्रमाण चांगलं होतं. सोबतच अनेकप्रकारच्या मेटाबॉलिज्मशी संबंधित आजार तुमच्या जवळही भटकणार नाहीत. केवळ वेट लॉस नाही तर आरोग्यही चांगलं राहतं द लॅंसेट डायबिटीस ॲन्ड इंडोक्रिनोलॉजी नावाच्या जर्नलमध्ये प्रकाशित या रिसर्चमध्ये या गोष्टीचं समर्थन करण्यात आले आहे की, कमी कॅलरीचं सेवन केल्याने केवळ वजन कमी होतं असं नाही तर तुमचं आरोग्यही चांगलं राहतं आणि शरीरात कॉम्प्लेक्स मेटाबॉलिक बदलही होत नाहीत. रिसर्चमध्ये ही गोष्ट सिद्ध करण्यात आली आहे की, जर तुम्ही तुमच्या दररोजच्या कॅलरी इनटेकमध्ये कमतरता आणाल तर याने ना केवळ वजनच कमी होईल तर डायबिटीस आणि हृदयाशी संबंधित धोकाही कमी होतो.

**२ वर्ष कॅलरी इनटेकमध्ये २५ टक्के घट :** या रिसर्चमध्ये अभ्यासकांनी २१ ते ५० वयोगटातील २०० महिला आणि पुरूषांची निवड केली आणि त्यांना दोन वेगवेगळ्या ग्रुपमध्ये विभागण्यात आले. एका ग्रुपला सांगण्यात आलं की, त्यांना २ वर्षांपर्यंत कॅलरी रिस्ट्रिक्शनची प्रॅक्टिस करायची आहे. या लोकांना सांगण्यात आले की, ते त्यांना हवं ते खाऊ शकतात. पण एक अट आहे. ती म्हणजे त्यांना त्यांच्या रोजच्या कॅलरी इनटेकमध्ये २५ टक्के घट करायची होती. तेच दुसऱ्या ग्रुपला सामान्य रूपाने खाणं-पिणं करण्यास सांगण्यात आलं.

**७१ टक्के लोकांचं वजन १० टक्के घटलं :** ज्या ग्रुपमधील लोकांना कॅलरी कमी करण्यास सांगण्यात आले होते, त्यांच्यातील जास्तीत जास्त लोक २५ टक्के कॅलरी करण्याचं टार्गेट पूर्ण करू शकले नाहीत आणि २ वर्षात त्यांनी सरासरी कॅलरीमध्ये ११.९ टक्के घट केली होती. जी दररोजच्या ३०० कॅलरीच्या बरोबरीत आहे. अभ्यासकांना आढळलं की, केवळ १ वर्षातच या ग्रुपमधील लोकांच्या कोलेस्ट्रॉल आणि ब्लड प्रेशरमध्ये कमतरता आढळली. सोबतच साधारण ७१ टक्के लोक त्यांचं वजन १० टक्क्यांपर्यंत कमी करण्यात यशस्वी ठरले.

**प्रोसेस्ड फूड करा अव्हॉइड :** डाएटमध्ये हेल्दी करणे जसे की, फळ आणि भाज्यांचं जास्त सेवन करावं आणि प्रोसेस्ड फूड खाणं कमी करावं. हे दोन्ही प्रभावी उपाय आहेत. या माध्यमातून तुम्ही कॅलरी कमी करू शकता आणि हेल्दी राहू शकता.

# मंत्रांमध्ये असणारी शक्ती



परिवार रक्षामंत्र

**अरिहे सर्व रक्ष हँ फट् स्वाहा।**

हा कुटुंबाचे संरक्षण करणारा मंत्र रोज सकाळी आणि सायंकाळी १ माळ जपून म्हटल्याने आलेले संकट दूर होते.

रोगनिवारक मंत्र

**नमो विप्पोसही पत्ताणं नमो खेलो सहि पत्ताणं नमो जल्लो सहि पत्ताणं नमो सव्बो सहि पत्ताणं स्वाहा।**

हा मंत्र म्हणत दररोज एक माळ जपल्याने सगळ्या प्रकारच्या रोगांपासून मुक्ती मिळते. आपले कष्ट कमी होतात.

द्रव्यप्राप्ती मंत्र

**ह्यी नमो अरिहंताणं सिद्धाणं आयरियाणं उवज्झायाणं साहूणं मम ऋद्धि-वृद्धी-समीहितं कुरू कुरू स्वाहा।**

या मंत्राचे दररोज सकाळ, दुपार, सायंकाळी प्रत्येक वेळी ३२ वेळा मनातल्या मनात जप केल्याने सुख-समृद्धी, धनलाभ आणि कल्याण होते.

**ह्यी श्री कलिकुंड स्वामिने नमः।**

या मंत्राचा सव्वा लाख जप केल्याने कठिणातील कठीण काम सिद्धीस जाते. गरिबी दूर होऊन लक्ष्मी प्राप्ती होते.

**नमो भगवते श्री पार्श्वनाथाय क्षेमं कराय ह्यी नमः।**

या मंत्राचा जप केल्याने अचानक येणारे संकट आणि भीती दूर होते.

**ह्यी श्री हर-हर स्वाहा।**

हा मंत्र दररोज १०८ वेळा जप केल्याने रोग, संकट आणि कोणत्याही प्रकारची चिंता दूर होते.

# ५ उपाय जे केल्यास रोबोटसारखं काम करूनही थकणारच नाही

**जी**वन इतके व्यस्त झाले आहे की विश्रांतीसाठी पुरेसा वेळच मिळत नाही. पण काही काही दिवस हे इतके कामामध्ये जातात की दिवसभर फक्त धावपळच असते. अशा परिस्थितीत शरीराला थकवा येणे सहाजिकच असते, परंतु तुम्हाला माहित आहे का की अशा परिस्थितीत शरीराची काही कार्ये थांबू शकतात. धावपळीच्या दिवसांचे शरीरावर काय परिणाम होतात?

- **१५ मिनिटांचं मेडिटेशन करा -** ध्यानधारणा अर्थात मेडिटेशन हा आराम करण्याचा एक अद्भुत मार्ग आहे. केवळ १५ मिनिटे ध्यानधारणा केल्याने शरीरातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढते. जे सुस्ती आणि थकवा दूर करण्यास मदत करते.
- **रोज एक्सरसाईज करा -** जे लोक दररोज व्यायाम करतात, त्यांना इतर लोकांपेक्षा कमी थकवा जाणवतो. दररोज 30 मिनिटे व्यायाम केल्याने रक्तप्रवाह अर्थात ब्लड फ्लो, एंडोर्फिन आणि एकूणच फिटनेसमध्ये वाढ होऊ शकते.
- **सुर्यप्रकाशाचा आनंद घ्या -** सूर्यप्रकाशाच्या पुरेशा संपकार्तून व्हिटॅमिन डी मिळते. हे जीवनसत्व सेरोटोनिन तयार करण्यास मदत करते. जे मूड आणि रिलॅक्सेशन नियंत्रित करणारे न्यूरोट्रांसमीटर आहे.
- **रिलॅक्सिंग म्युजिक ऐका -** जर तुम्ही दिवसभर थकला असाल तर झोपण्यापूर्वी आरामदायी किंवा रिलॅक्स करणारे एखादे संगीत ऐकणे फायदेशीर ठरू शकते. यामुळे मूड रिलॅक्स होऊन डोके शांत होते. ज्यामुळे चांगली झोप येते आणि दुसऱ्या दिवशी तुम्हाला दिवसभर उत्साही वाटते.
- **मित्रमैत्रीणींना भेटा -** तणाव दूर करण्यासाठी सोशल कनेक्शन हा एक अत्यंत प्रभावी मार्ग आहे. यामध्ये तुम्ही चांगले वाटणारे मित्र, कुटुंबातील सदस्य किंवा ओळखीच्या लोकांना भेटू शकता. भेटणे शक्य नसेल तर फोनवरच बोला यामुळे मन हलके होईल, हसाल व खिदळाल व टेन्शन विसरून जाल.



# लिंबू पाणी पिण्याचे फायदे तितकेच तोटेही



**जे**व्हा आपल्याला एखाद्या गोष्टीचे फायदे जाणून घ्यायचे असतात तेव्हा आपण गुगलवर त्याची माहिती शोधतो. लिंबूसह पाणी हे एक पेय आहे ज्यामध्ये आरोग्यासाठी अनेक फायदे आहेत. मात्र, तितकेच त्याचे तोटेही आहेत.

**लिंबू पाणी पिण्याचे फायदे**

१.लिंबू विटमिन सी चे चांगले स्त्रोत आहे. या मध्ये इतर व्हिटॅमिन्स जसे की थायमिन, रायबोफ्लॅविन, नियासिन, व्हिटॅमिन बी-६ फोलेट आणि व्हिटॅमिन ई थोड्या प्रमाणात आढळतात. या मुळे घसा खराब होणे,बद्धकोष्ठता किडनी आणि हिरड्यांच्या समस्येपासून आराम देतो. रक्तदाब आणि तणाव देखील कमी करतो. त्वचा निरोगी बनविण्यासह लिव्हरसाठी देखील चांगले आहे.

२.पचन क्रिया संतुलित करण्यात आणि कर्करोगापासून बचाव करण्यासाठी हे मदत करते. या मध्ये अनेक प्रकारचे खनिजे जसे मॅग्नेशियम, फॉस्फरस, कॅल्शियम, पोटॅशियम आणि जिंक आढळते.

३.मूतखडा मध्ये देखील हे आरामदायक आहे. लिंबू पाणी प्यायल्याने शरीर रिहायड्रेट होण्यात मदत मिळते. हे युरीन पातळ करण्यात मदत करतो.

४.मधुमेह असल्यास किंवा वजन कमी करायचे असल्यास साखरेच्या पातळीला न वाढवता शरीराला रिहायड्रेट करून ऊर्जा देतो.

५.घसा खराब असल्यास कोमट पाण्यात लिंबू पिळून प्यायल्याने घसा बरा होतो.

६.वजन कमी करण्यासाठी दररोज मधासह कोमट पाणी प्यायल्याने जास्तीचे वजन कमी करू शकतो.

**लिंबू पाण्याचे तोटे**

**पोट खराब होऊ शकते :** लिंबू पोटासाठी खूप फायदेशीर असले तरी पाण्यात जास्त पिळून खाल्ल्याने पोटात गॅस्ट्रोएसोफेजल रिफ्लक्स डिसीज आणि ॲसिड रिफ्लक्स सारख्या समस्या उद्भवू शकतात. या दोन्ही समस्या लिंबासारख्या आम्लयुक्त अन्नापासून सुरू होतात. यामुळे छातीत जळजळ, मळमळ आणि उलट्या होऊ शकतात.

**त्वचेसाठी हानिकारक :** जर्नल ऑफ एन्व्हायर्नमेंटल हेल्थमध्ये २००७ च्या अभ्यासात, संशोधकांनी २१ वेगवेगळ्या रेस्टॉरंटमधील ७६ लिंबूंचे नमुने तपासले. यापैकी अनेक लिंबांच्या सालींवर असे अनेक सूक्ष्मजीव आढळून आले ज्यामुळे रोग होऊ शकतात. हे टाळण्यासाठी पाण्यात लिंबाची साल टाकण्याऐवजी त्याचे फक्त थेंब पाण्यात टाका.

**जळजळ वाढवू शकते :** लिंबू पाणी लहान जखमांमध्ये वेदना आणि जळजळ वाढवू शकते. किरकोळ जखमा एक किंवा दोन आठवड्यांत बऱ्या होतात. परंतु, अमेरिकन डेंटल असोसिएशनच्या मते, जास्त लिंबू पाणी प्यायल्याने कॅन्कर फोड वाढू शकतात. जास्त प्रमाणात लिंबूवर्गीय फळे खाल्ल्याने जखमा बऱ्या होण्यास विलंब होतो.

# वजन कमी करण्यासाठी रोज प्या जिऱ्याचे पाणी



**आ**जकाल धकाधकीच्या जीवनामुळे आणि खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयींमुळे वजन वाढणं ही एक सामान्य समस्या बनली आहे. जास्त वजन आरोग्यासाठी हानिकारक ठरतं, यामुळे उच्च रक्तदाब आणि हृदयविकार यांसारख्या अनेक आरोग्य समस्या उद्भवतात. अशा परिस्थितीत वजन कमी करणं खूप गरजेचं आहे. वजन कमी करण्याचा एक नैसर्गिक आणि प्रभावी मार्ग म्हणजे दररोज जिरे पाणी पिणं. ते घरीही सहज बनवता येतं. जिऱ्यामध्ये अँटी-ऑक्सिडेंट्स आणि फायबर असतात जे वजन नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. जिरा पाण्यामुळे पचनकार्य सुधारतं आणि विषारी पदार्थ बाहेर टाकले जातात. आता हे जिरे पाणी नक्की बनवायचं कसं? तर पटकन वजन कमी करायचं असल्यास याच्या विविध पद्धती आहेत, यातील काही जाणून घेऊया.

१. साधं जिऱ्याचे पाणी
२. लिंबू जिरा पाणी
३. आलं-जिरा पाणी
४. दही आणि जिरा पाणी
५. गूळ आणि जिरे पाणी
६. मेथीचे दाणे आणि जिरे पाणी

# ताप आला असताना आंघोळ करणं योग्य आहे का?




बदलत्या वातावरणामुळे सर्दी-खोकल्याचा त्रास होणं सामान्य आहे. या सगळ्याशिवाय बदलत्या हवामानात संसर्गजन्य तापाचा धोका खूप जास्त राहतो. अशा वेळी, आपण स्वतःचं संरक्षण करणं आणि स्वतःची काळजी घेणं सर्वात महत्त्वाचं आहे. तुमची प्रतिकारशक्ती मजबूत राहिल्यास तुम्हाला व्हायरल आजार जडणार नाहीत. बदलत्या हवामानामुळे होणारे आजार टाळायचे कसे? हा सर्वात मोठा प्रश्न असतो. ताप टाळण्यासाठी काय करावं? ताप जर आलाच तर काय खावं? ताप आला तर आंघोळ करावी की नाही? असे अनेक प्रश्न मनात निर्माण होतात.

**संसर्गजन्य ताप सारखा का येतो?**

पावसाळा ऋतुत संसर्गजन्य तापाची प्रकरणं दुप्पट वेगाने वाढतात. संपकार्तील एखाद्या व्यक्तीला ताप आल्यास दुसऱ्या व्यक्तीलाही त्याची लागण होते. कधी एखाद्याला ताप आला तर तो ठराविक कालावधीनंतर सतत येत राहतो. ज्याची प्रतिकारशक्ती कमकुवत असते, अशा व्यक्तीला वारंवार संसर्गजन्य तापाचा धोका असतो. हे विशेषतः लहान मुलं आणि वृद्ध लोकांमध्ये दिसून येतं, या पावसाळ्यात या लोकांना सतत ताप येतो. थंड वातावरणामुळे सतत ताप येत राहतो.

**ताप आला असताना आंघोळ करावी की नाही?**

सर्वात मोठा प्रश्न म्हणजे संसर्गजन्य ताप असताना आंघोळ करावी की नाही? तर जेव्हा तुम्हाला व्हायरल फिव्हर येतो, त्यावेळी स्वच्छतेची विशेष काळजी घेतली पाहिजे. तुम्ही जितके स्वच्छ असाल तितक्या लवकर तुम्ही बरे व्हाल. जर तुम्हाला व्हायरल फिव्हर असेल तर तुम्ही कोमट पाण्याने आंघोळ केली पाहिजे. आंघोळ केल्यास तुम्हाला अधिक फ्रेश वाटेल.

**ताप असताना घरी बसून औषध घेणं योग्य की अयोग्य?**


तज्ञांचं म्हणणं आहे की, व्हायरल ताप आल्यास घरी बसून मेडिकलमधून औषधं आणून घेऊ नये. तर एकदा डॉक्टरांकडे देखील जाऊन यावे, डॉक्टरांचा योग्य सल्ला घ्यावा. स्वतःच मेडिकलमधून गोळ्या आणून बरं होण्याचा प्रयत्न केल्यास ताप बराच काळ राहू शकतो. ताप लवकर जाण्यासाठी आणि स्वतःचं संरक्षण करण्यासाठी तुम्ही गरम पाणी, आल्याचा चहा, काढा पिऊ शकता आणि वाफ घेऊ शकता. या घरगुती उपायांनी तुम्हाला बरं वाटेल, पण त्यामुळे ताप कमी होणार नाही. अशा परिस्थितीत चांगल्या उपचारांची गरज असते, त्यामुळे स्वतः स्वतःवर उपचार न करता डॉक्टरांचा सल्ला घेणं आवश्यक आहे.

## ड्रग्ज तस्करीत वाढतोय महिलांचा सहभाग

# नवे ड्रग्ज पेडलर्स होताहेत सक्रिय, पोलिसांना आव्हान

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

ड्रग्जमाफिया ललित पानपाटील, छोटी भाभी, हिना शेख यांच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्याने ड्रग्ज रॅकेट उद्ध्वस्त झाले आहे. तरीही, शहरात अजूनही एमडी ड्रग्जची चोरीछुप्या विक्री सुरुच असल्याचे शिक्कामोर्तब झाले आहे. शहरात ड्रग्ज पेडलरची धरपकड केली जात असली तरी नव्याने ड्रग्ज पेडलर समोर आले आहे. विशेष म्हणजे, ड्रग्ज तस्करीत महिलांचा दिवसेंदिवस सहभाग वाढत आहे. एमडी विक्रीवर अद्याप आळा बसू न शकल्याने पोलिसांसमोर एमडीचे रॅकेट समूळ नष्ट करण्याचे आव्हान आहे.




- तपासात ड्रग्जच्या आहारी गेलेल्या महिला इंजेक्शन आणि पावडरमार्फत ड्रग्ज घेत असल्याचे समोर आले आहे.
- ड्रग्ज तस्करीमध्ये ६० टक्के विक्रेते गुन्हेगारी पार्श्वभूमीतील आहेत.
- एमडी तस्करी मुंबईमार्गे नाशिकमध्ये केल्याचे तपासात उघडकीस आले आहे.
- ड्रग्ज तस्करी व सेवनामध्ये उच्चभ्रू घरातील पुरुष व महिलाही आहेत.
- अटकेतील महिलांनी मागणीनुसार एक ग्रॅम ड्रग्ज दोन ते अडीच हजार रुपयांना विक्री केली आहे.
- ड्रग्ज तस्करी काडीपेटी, सिगारेट पाकीटचा वापर करण्यात आला आहे. एक ग्रॅमसाठी छोटी प्लास्टिक पिशवी वापरत असल्याचे समोर आले आहे.

ड्रग्जमुक्त नाशिकसाठी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या पहिल्या महिला वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुशिला कोल्हे यांच्या पथकाने मॅफेड्रॉन अर्थात एमडी तस्करीचे रॅकेट उद्ध्वस्त केले आहे. विशेष म्हणजे, वर्षभरात एमडी तस्करीमध्ये पहिल्यांदाच महिलांचा सहभाग वाढल्याचे समोर आले आहे.

पोलिसांनी इंदिरानगरमधील छोटी भाभी, ड्रग्जमाफिया ललित पानपाटीलची मैत्रीण प्रज्ञा कांबळे, अर्चना निकम यांना पकडले. ऑक्टोबर २०२४ मध्ये हिना शेखसह तिचा पती व भावाला पकडले. त्यानंतर अंमली पदार्थविरोधी पथकाने ऋतुजा झिंगाडे, स्विटी अहिरे, पल्लवी निकुंभ ऊर्फ सोनाली शिंदे यांना अटक केली.पथकाने एक मार्च २०२५ रोजी नाशिकरोड रेल्वे स्टेशन परिसरात शबाना अन्सारी हिला पतीसह अटक केली. तिला ड्रग्ज तस्करीत तिच्या पतीने आणले. सात अपत्य असल्याने संसाराचा गाडा ओढणे अवघड झाल्याने तिने पतीसोबत एमडी तस्करीचा मार्ग निवडल्याचे तपासात उघड झाले. व्दारका परिसरातील हॉटेलमध्ये छापा टाकत ३० ग्रॅम एमडी जप्त केले. यावेळी संशयित हिना कापसे हिला ताब्यात घेतले. त्यावेळी तिने अर्वाच्य भाषेत संवाद साधला. माझे कोणीच काही करू शकत नाही, असे म्हणत तिने पोलिसांना काही गुन्हेगारांच्या ओळखी दिल्या.

**या महिला पोलिसांच्या जाळ्यात**

छोटी भाभी, हिना शेख, प्रज्ञा कांबळे, अर्चना निकम, ऋतुजा झिंगाडे, स्विटी अहिरे, पल्लवी निकुंभ ऊर्फ सोनाली शिंदे, शबाना अन्सारी, हिना कापसे, दीपाली ऊर्फ टिना ऊर्फ अंकिता पाटील-पटेल, मरीयम शेख ऊर्फ मनीषा.

**या कारणातून महिला तस्करीत**

एमडी तस्करीच्या गुन्ह्यात महिलांचा वाढता सहभाग चिंताजनक आहे. झटपट पैसा, कौटुंबिक अडचणी व पतीमुळे महिलांनी ड्रग्ज विक्री केल्याची तपासात समोर आले आहे. नशेसह हौस भागविण्यासाठी तीन महिलांनी ड्रग्ज तस्करीचा मार्ग निवडल्याचे उघड झाले.

**ब्युटी पार्लरमधून ड्रग्ज तस्करी**

ऋतुजा, स्विटी व सोनाली या तिघीही ड्रग्ज सेवन करतात. या तिघीही कारागृहात आहेत. सोनालीचा पती मध्यप्रदेशातील एका एमडी कारखान्यातील गुन्ह्यात संशयित आरोपी असून, त्याच्या पाठिंब्याने ती तस्करीत आली. ती ड्रग्ज तस्करीतील मास्टरमाइंड आहे. एनडीपीएसच्या कोठडीत असलेल्या काही महिला ब्युटी पार्लर चालवायच्या. त्यातून त्यांना गरजेनुसार पैसेही मिळत होते. मात्र, पती आणि मैत्रिणींमुळे ड्रग्ज तस्करीत महिला आल्याचे समोर आले आहे.

**या क्रमांकावर द्या माहिती**

ड्रग्जमुक्त नाशिकसाठी पालकांनी मुलेमुली पॉकिटमनीचे काय करतात, त्यांचा मित्रपरिवार कोण आहे, याकडे लक्ष दिले पाहिजे. ड्रग्जप्रकरणी काही माहिती असल्यास नागरिकांनी सीपी व्हॉट्सॲप क्रमांक ९९२३३२३३११ या क्रमांकावर माहिती पाठवावी, असे आवाहन नाशिक शहर पोलिसांनी केले आहे.

**कॉल गर्लची कसून चौकशी**

अटक करण्यात आलेल्या कॉल गर्लची कसून चौकशी करण्यात आली असता, संपूर्ण घटना उघडकीस आल्याचे वृत्त समोर आले. तिने सांगितलं की, ती तिच्या आकर्षणाने आणि हावभावांनी पुरुषांना तिच्या प्रेमाच्या जाळ्यात अडकवायची. तिच्या प्रेमाच्या जाळ्यात अडकवून तिने अनेकांना आपल्या फ्लॅटवर आणलं आहे. नंतर त्याच्यासोबत शरीरसंबंध ठेवले आहेत.

## फ्लॅटमध्ये एक कॉलगर्ल आणि ५ तरूण! सापडल्या 'त्या' गोळ्या आणि...

**■मुंबई । प्रतिनिधी,**

देशभरात अवैधपणे सुरु असलेल्या सेक्स रॅकेटनं वर डोकं काढलं आहे. मोठ्या प्रमाणात वेश्यव्यवसाय फोफावता असल्याचे आता पोलिसांच्या निदर्शनास आले. एका वेळ निश्चित करण्यात आली असून स्टेशन हाऊस




ऑफिसर धनंजय सिंह यांनी एक गुप्त पथक तयार केलं. पोलिसांनी दार ठोठावलं तेव्हा दरवाजा आतून बंद होता. जेव्हा दरवाजा उघडण्यात आला आणि आतील लोकांनी पोलिसांना पाहिलं, ज्यामुळे परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं. दाराआड भलतंच कांड सुरु होतं. पोलिसांना छापा टाकत सर्वांना ताब्यात घेतलं. या घटनेनं परिसरातील कॉलनीत खळबळ माजली. हा धक्कादायक प्रकार आता बारकाईने उघडकीस आल्याचे वृत्त समोर आलं.

**आरोपीला अटक**

या छाप्यातील आरोपी रोहित ठाकूरला अटक करणं हे या मागील मोठं यश होतं. तो पोलिसांना चुकवून, त्यांची फसवणूक करूनच येथे आला होता. रोहितसह, सोनू, बसंत. अभय, विक्रम आणि सुधांशू यांनाही पोलिसांनी रंगेहाथ पकडलं होतं. छाप्यादरम्यान, खोल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात ड्रग्ससाठा देखील आढळून आला होता. घटनास्थळावरून पोलिसांनी तब्बल सहा मोबाईल आणि ४ हजार १०० रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आले. हे सर्व पुरावे सील करण्यात आले असून अशा अवैध व्यापारी करणाऱ्यांना न्यायालयात पाठवलं आहे.

## एमडी ड्रग्ज सप्लायर बंटी-बबली जाळ्यात

- संशयित फरहान शेख ऊर्फ दहशत हा रेकॉर्डवरील गुन्हेगार
- संशयित नाशिक शहर व जिल्ह्यातून तडीपार
- संशयिताविरुद्ध भद्रकाली पोलीस ठाण्यात ३, अंबड व मुंबई नाका पोलीस ठाण्यात प्रत्येकी एक गुन्हा दाखल
- संशयित मरीयम ऊर्फ मनीषा शेख हिचा काठे गल्ली ड्रग्ज विक्रीप्रकरणात सहभाग निष्पन्न



**■नाशिक। प्रतिनिधी,**

इंदिरानगरमध्ये दोन तरुणांकडून एमडी ड्रग्ज जप्त केल्याची घटना ताजी असताना अंमली पदार्थविरोधी पथकाने एमडी ड्रग्जचा पुरवठा करणाऱ्या बंटी-बबली यांना सापळा रचून अटक केली. पथकाने त्यांच्या ताब्यातून २५ हजारांच्या ५ ग्रॅम एमडी व इतर २ लाख ५४ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

फरहान कलीम शेख ऊर्फ दहशत (वय २८, दोघेही रा. आयशा पार्क, नायकवाडीपुरा, अजमेरी चौक, जुने नाशिक), मरीयम फरहान शेख ऊर्फ मनीषा (२८) अशी अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुशिला कोल्हे यांना शनिवारी (दि.२०) संशयित फरहान शेख हा त्याच्या पत्नीसमवेत श्री. श्री. रविशंकर मार्ग रोडवर आदित्य नगरमध्ये एमडी ड्रग्ज विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार अंमली पदार्थ विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदारांनी सापळा रचला. पथकाने संशयित दोघांना ताब्यात घेतले. पथकाने त्यांच्याकडून २५ हजारांच्या ५ ग्रॅम एमडी व इतर २ लाख ५४ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. या घटनेमुळे ड्रग्ज तस्करांचे धाबे दणाणले आहेत. याप्रकरणी दोघांविरुद्ध मुंबईनाका पोलीस ठाण्यात एनडीपीएस १९८५ कलम ८(क), २२ (ब), २९ प्रमाणे, कलम मपोका १४२ व मोवाका ३९ / १९२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास मुंबईनाका पोलीस करीत आहेत.

**ड्रग्ज तस्करीसाठी विनाक्रमांक बुलेटचा वापर**


संशयित फरहान शेख ऊर्फ दहशत हा तडीपार गुन्हेगार असून, तो स्वतःची ओळख लपवून नाशिक शहरात वावरत होता. तो पत्नीसह विनक्रमांकाच्या बुलेटवरून ड्रग्ज तस्करी करत असल्याचे तपासात समोर आले आहे.

## मुंबईत वर्षभरात ७०० कोटींचे अंमली पदार्थ जप्त

**■मुंबई। प्रतिनिधी,**

नवीन वर्षाच्या स्वागतापूर्वीच मुंबई पोलिसांनी अंमली पदार्थ तस्करीविरोधात आतापर्यंतची सर्वात मोठी मोहीम राबवली आहे. २०२५ मध्ये पोलिसांनी आतापर्यंत ७०० कोटींपेक्षा अधिक किंमतीचे विविध अंमली पदार्थ जप्त केले असून, हा आतापर्यंतचा वार्षिक विक्रम ठरला आहे. येत्या ३१ डिसेंबरला प्रयत्न करत आहेत. या माहितीच्या आधारे आणि न्यू इयर सेलिब्रेशन लक्षात घेऊन मुंबई पोलिसांनी गेल्या महिनाभरात शहरात विशेष आणि धडक मोहिमा राबवल्या आहेत.

गेल्या महिन्यातील कारवाईत 'एनडीपीएस' कायद्यान्वये गुन्हेगार ठरलेले ३,०१५ ड्रग हिस्ट्रीशीटर्सवर विशेष नजर ठेवण्यात आली आहे. जेणेकरून ३१ डिसेंबरच्या रात्री अंमली पदाथार्ची तस्करी आणि पुरवठा पूर्णपणे रोखला जाईल.




एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, न्यू इयर सेलिब्रेशन सुरक्षित आणि अंमली पदार्थमुक्त राहणे हा आमचा सर्वोच्च प्राधान्यक्रम आहे. अंमली पदार्थ पार्टी सर्किटपर्यंत पोहोचू दिले जाणार नाहीत,' असे त्यांनी स्पष्ट केले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, सणासुदीच्या काळात अंमली पदार्थांचे नेटवर्क डावलण्यासाठी यंदा

अंमली पदार्थ विरोधी पथकाचे उपायुक्त नवनाथ ढवळे म्हणाले की, पोलिसांनी यावर्षी पाच अंमली पदार्थ उत्पादन युनिट्सचा पदार्फाश केला असून त्यामुळे अंमली पदार्थांचे नेटवर्क कमकुवत झाले आहे. नवीन वर्षाच्या काळात आमचे विशेष लक्ष हेच राहील की अंमली पदार्थ पार्टीपर्यंत पोहोचू नयेत.

आतापर्यंत १३७२ तस्करांना अटक करण्यात आली आहे. याशिवाय, ड्रग्जचे सेवन करणाऱ्या ६,२०० पेक्षा जास्त व्यक्तींवरही कारवाई करण्यात आली आहे.

नवीन वर्षाच्या अगोदर, मुंबईतील ३० पेक्षा जास्त संवेदनशील ठिकाणी नाइटलाइफ हब्स, किनारा परिसर, महामार्ग आणि लोकप्रिय पार्टी स्पॉट्स येथे कठोर नजर ठेवण्यात आली आहे. क्लब्स, संभाव्य रेव्ह पार्टी साइट्स आणि मोठ्या कार्यक्रमांवर पोलिस व गुप्तचर यंत्रणांची पथके तैनात आहेत.

दुसऱ्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, ३१ डिसेंबरच्या रात्री ड्रग्ज पार्टीपर्यंत पोहोचू नयेत म्हणून विशेष गस्त आणि पाळत वाढवली जाईल आणि यासाठी अनेक विशेष पथके तयार करण्यात आली आहेत.

## हवेच्या गुणवत्तेचा खरा निर्देशांक कोणता? केंद्र सरकार, बीएमसीसह आंतरराष्ट्रीय वेबसाइटवरील आकडेवारीत मोठी तफावत

**■मुंबई। प्रतिनिधी,**

दिल्लीतील धुरक्याचे धडकी भरवणारे व्हिडीओ आणि रील सर्वदूर पोहोचल्यानंतर मुंबईकरांनीही आपल्या आजूबाजूच्या हवेच्या गुणवत्ता निर्देशांकावर अधिक लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे. यासाठी विविध ॲप, विविध आंतरराष्ट्रीय वेबसाइट यासोबतच केंद्र सरकारचे समीर ॲप, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाची वेबसाइट, उष्णकटीबंधीय हवामान विज्ञान संस्थेची (आयआयटीएम) हवेच्या गुणवत्तेचा इशारा देणारी यंत्रणा अशा विविध माध्यमांतून माहिती मिळवली जाते. मात्र यामध्ये काही वेळा केंद्र सरकार, मुंबई महापालिका आणि इतर आंतरराष्ट्रीय वेबसाइट यातील आकडेवारीमध्ये मोठी तफावत आढळत आहे.

'समीर ॲप'वरील नोंदीनुसार बोरिवली पूर्व (आयआयटीएम, एमपीसीबी), चकाला (आयआयटीएम), कांदिवली पश्चिम (आयआयटीएम), माझगाव (आयआयटीएम), मालाड पश्चिम (एमपीसीबी), सिद्धार्थनगर (आयआयटीएम) आणि शीव (एमपीसीबी) या केंद्रांवरील हवेचा गुणवत्ता निदेर्शांक समाधानकारक श्रेणीत असल्याचे दिसले. मात्र त्याच वेळी सकाळच्या सुमारास 'आयक्यू एअर' या वेबसाइटवर सकाळच्या वेळी मुंबईच्या हवेचा गुणवत्ता निर्देशांक ११७ असल्याची नोंद झाली. जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषानुसार, हा निर्देशांक हवेची गुणवत्ता वाईट असल्याचे दर्शवत होता, असेही दिसले. 'एक्यूआय डॉट इन' या वेबसाइटवरील नोंदीनुसार हा निदेर्शांक सकाळच्या सुमारास १३७ होता.

हवेचा गुणवत्ता निर्देशांक तपासताना समीर ॲप किंवा भारतीय सरकारी वेबसाइटवरील नोंदींचा आधार घ्यावा, असे सातत्याने सांगण्यात येते. मात्र काही वेळा डोळ्यांना दिसणाऱ्या धुरक्याचे पडसाद प्रत्यक्ष या ॲपवरील आकडेवारीत उमटत नाहीत, असेही मत मुंबईकर नोंदवतात. त्यामुळे केवळ सरकारी आकडेवारीवर अवलंबून राहण्यापेक्षा मुंबईकर या खासगी ॲपच्या आधारेही प्रदूषण निर्देशांक तपासतात.

आयआयटीएमची आकडेवारी काही केंद्रांवर काही वेळा वाईट नोंदली जाते, त्यावेळी समीर ॲपवरील या केंद्राची आकडेवारी दाखवणे बंद केले जाते, अशी माहिती आयआयटीएमशी निगडीत एका अधिकाऱ्याने नाव जाहीर न करण्याच्या अटीवर दिली. यामध्ये आकडेवारीमध्ये फेरफार केला जात नसेल का, असाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला. प्रत्यक्ष २४ तास हवेच्या गुणवत्तेची नोंद ठेवणारी यंत्रणा अधिक विश्वासार्ह असून काही वेळा परदेशी वेबसाइट सॅटेलाइटच्या मदतीने नोंदी घेतात. सॅटेलाइटच्या नोंदी तुलनेने कमी विश्वासार्ह असतात, अशी माहिती प्रदूषण अभ्यासक डॉ. मिलिंद कुलकर्णी यांनी दिली. त्यामुळे हा फरक होत असेल असेही ते म्हणाले.

**केंद्रीय माध्यमिक शिक्षण**

मंडळाच्या अधिकृत शाळांसाठी 'सीबीएसई' शब्द वापरता येतो. मात्र राज्य मंडळाच्या शाळांनी सीबीएसई शब्द नावात वापरणे अनुचित असल्याचेही संचालनालयाने स्पष्ट केले आहे. तसेच, 'इंटरनॅशनल' किंवा 'ग्लोबल' असे शब्द वापरण्यासाठी संबंधित शाळेची परदेशातील शाखा किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील अधिकृत संलग्नता असणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे नवीन मान्यता तसेच दजार्वाढीचे प्रस्ताव सादर करणाऱ्या शाळांच्या नावांची तपासणी करण्याचे निर्देशही संचालनालयाने दिले आहेत. पालक, विद्यार्थी आणि समाजाची दिशाभूल होईल अशी नावे असल्यास ती तात्काळ बदलण्याबाबत संबंधित शाळा व्यवस्थापनांना सूचित करण्यात येणार आहे. तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या शाळांच्या नावांमध्येही असे शब्द आढळल्यास त्यावर कारवाई करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

## शाळेच्या नावांमधून ग्लोबल, इंटरनॅशनल काढा

### राज्य मंडळाच्या अखत्यारीतील शाळांना शिक्षण संचालनालयाचे निर्देश

**■मुंबई। प्रतिनिधी,**

ग्लोबल, इंटरनॅशनल, सीबीएसई अशा शब्दांचा वापर करून राज्य मंडळाच्या अखत्यारीत असलेल्या शाळा पालकांची दिशाभूल करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे पालकांची फसवणूक थांबविण्यासाठी शिक्षण संचालनालयाने शाळांच्या नावांमधून असे शब्द वगळण्याचे निर्देश दिले आहेत. याबाबतचे पत्रक संचालनालयाने नुकतेच जारी केले आहे.

राज्य शिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या शाळाही आपल्या नावापुढे 'इंटरनॅशनल', 'ग्लोबल', 'सीबीएसई' किंवा 'इंग्लिश मिडियम' अशा शब्दांचा वापर करत असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे शाळा आंतरराष्ट्रीय किंवा केंद्रीय मंडळाशी संलग्न असल्याचे पालकांना वाटते. यामाध्यमातून पालकांच्या फसवणुकीचा धोका वाढत असल्याचे शिक्षण संचालनालयाच्या निर्दशनास आले आहे.




## मनात भक्ती, सतत देवाचे नामस्मरण पण नियती आडवी आली, त्या चौघांसोबत काय घडले?

**■बुलढाणा। प्रतिनिधी,**

महाराष्ट्रात रस्ते अपघातांचे प्रमाण सध्या वाढले आहे. गेल्या २४ तासांत बुलढाणा आणि पुणे जिल्ह्यात दोन अत्यंत भीषण अपघात झाले आहेत. या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये ४ तरुणांना आपला जीव गमवावा लागला असून ५ जण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनांमुळे मलकापूर आणि शिक्रापूर परिसरात शोककळा पसरली आहे.

**बुलढाण्यात झाडाला धडकून कारचा चक्काचूर**

बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर-धुपेश्वर रस्त्यावर मध्यरात्रीच्या सुमारास एक काळीज पिळवटून टाकणारी घटना घडली. मलकापूर येथील पाच मित्र कारने धुपेश्वरच्या दिशेने जात असताना धरणगाव जवळ हा अपघात झाला. रात्रीची वेळ असल्याने रस्ता रिकामा होता. त्यामुळे कारचा वेग जास्त होता. मात्र धरणगावजवळ अचानक चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि भरधाव कार रस्त्याच्या कडेला असलेल्या एका मोठ्या झाडावर जोरात आदळली. ही धडक इतकी भीषण होती की कारचा पुढचा भाग पूर्णपणे चेपला गेला.

या अपघातात रुद्र पवार (१९), विनायक अत्तरकार (२०) आणि गणेश इंगळे (२०) या तिघांचा जागीच मृत्यू झाला. तर इतर दोन मित्र गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

**पुण्यात देवदर्शन करून परतताना काळाचा घाला**

तर दुसरीकडे, पुणे जिल्ह्यातील चाकण-शिक्रापूर महामार्गावर ट्रक आणि कारची समोरासमोर धडक झाली. कारमधील तरुण देवदर्शन घेऊन आनंदाने आपल्या घराकडे चाकणच्या दिशेने निघाले होते, मात्र वाटेतच काळाने घाला घातला. शिक्रापूर परिसरातील सणसवाडी फाट्याजवळ समोरून येणाऱ्या एका अवजड ट्रकने कारला जोरदार धडक दिली. प्राथमिक अंदाजानुसार, ओव्हरटेकिंगच्या प्रयत्नात ही समोरासमोर धडक झाली असावी. धडक लागताच कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आणि कार ट्रकच्या खाली अडकली. कार चालक सागर थोरात याचा जागीच मृत्यू झाला असून, त्याच्यासोबत असलेले इतर तीन मित्र गंभीर जखमी झाले आहेत. जखमींची प्रकृती चिंताजनक असून आहे. त्यांना तातडीने उपचारासाठी पुण्यातील खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या दोन्ही घटनांनंतर पोलिसांनी पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर, रात्रीच्या वेळी वाहनाचा वेग मर्यादित ठेवणे आणि ओव्हरटेकिंग करताना विशेष काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.



## ऑटिस्टिक मुलांना आरटीई प्रवेश नाकारला! अंधेरीतील शाळेविरोधात महिलेची हायकोर्टात धाव

**■मुंबई । प्रतिनिधी,**

सात वर्षांच्या ऑटिस्टिक जुळ्या मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (आरटीई) कायद्यांतर्गत प्रवेश नाकारणाऱ्या अंधेरीतील शाळेविरोधात न्यायालयात धाव घेतली आहे. शाळेच्या मनमानी निर्णयामुळे संविधानाच्या अनुच्छेद १४ (समानता), २१ (जीवन) आणि २१ए (शिक्षणाचा अधिकार) अंतर्गत हमी दिलेल्या सर्वसमावेशक शिक्षणाचा मूळ उद्देशच निष्फळ ठरत आहे, असा दावा याचिकाकर्त्या ॲड. रिटा जोशी यांनी केला आहे. याचिकेवर लवकरच सुनावणी होण्याची शक्यता आहे.

याचिकाकर्त्या ॲड. रिटा जोशी उच्च न्यायालयात



वकिली करतात. त्यांनी अंधेरीतील शाळेच्या बेकायदेशीर धोरणावर तीव्र आक्षेप घेतला आहे. आरटीई कायदा आणि दिव्यांग व्यक्ती हक्क कायद्यांतर्गत हक्कांकडे लक्ष वेधत त्यांनी याचिका दाखल केली आहे. जेव्हा जुळी मुले अडीच वर्षांची होती, तेव्हा त्यांना पहिल्यांदा ऑटिस्टिक स्पेक्ट्रम डिसऑर्डर आणि अटेंशन डेफिसिट हायपरॲक्टिव्हिटी डिसऑर्डर असल्याचे निदान झाले होते.

जुलै २०२४ मध्ये त्यांनी आरटीईअंतर्गत अर्ज केला आणि त्यांना अंधेरी येथील शाळा मिळाली होती. त्यानुसार त्यांनी सर्व प्रक्रियात्मक आवश्यक बाबींची पूर्तता केली. मात्र ऑगस्ट-सप्टेंबर २०२४ मध्ये शाळेने विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी सुविधा नसल्याचे कारण देत जुळ्या मुलांना प्रवेश नाकारला. शाळेने याचिकाकर्त्या जोशी यांना स्वतःच्या खर्चाने शॅडो टीचर्सची नियुक्ती करण्याचा आग्रह धरला होता. त्यानंतर जोशी यांनी शिक्षण विभागाला आरटीईअंतर्गत मिळालेल्या प्रवेशाची अंमलबजावणी करण्याची मागणी करत पत्र लिहिले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com